1.ब्लैंक कॉल
2. हसलो म्हणजे सुखात आहे ऐसे नाही
3. बॉस
4. हृदय फेकले तुझ्या दिशेने
5. आता उरले ना दिस; रूसण्याचे-भांडण्याचे
6. आठवत तुला ?
7. अजुन तरी रुळ सोडुन सुटला नाही डब्बा
8. हे गंधित वारे फिरणारे
9. दुपार
10. आयुष्या वर बोलू काही
11. मेघ नसता वीज नसता, मोर नाचु लागले,
12. नसतेस घरी तू जेव्हा
13. करु वाटे खरे तर तुला एक फोन
14. कितीक् हळवे, कितीक् सुंदर,
15. जुबा तो डरती है कहने से
16. मी हजार चिंतांनी हे डोके खाजवतो
17. आताशा.. असे हे.. मला काय होते!!!
18 असेनही जरी मी सर्वांनी सोडलेलामी फसलो म्हणूनी हसूदे वा चिडवूदे कोणी
19. उत्कट-बित्कट होऊ नये, भांडू नये, तंडू नये..
20. दिवानों की बाते है
21. दाढी काढून पाहिला आन् दाढी वाढून पाहिला
22. नास्तिक
23. हे भलते अवघड असते
24. नामंजूर
25. कसे सरतील सये...
26. मी मोर्चा नेला नाही
27. सरीवर सर
28. लागते अनाम ओढ श्वासाना
29. दूरदेशी गेला बाबा... गेली कामावर आई
30. करार
31. आयुष्यावर बोलू काही या कवितेमधील सीडी मध्ये नसलेली काही कडवी...
32. तुटले
33. मी फसलो म्हणूनी हसूदे वा चिडवूदे कोणी
34. तू
35. Priye ye nighoni ghnanchya kadene
36. Paus asa runjhunta
37. Tujhe ni majhe naate kay?...
38. Ajun ujadat nahi ga !
39. Sang sakhya re aahe ka ti ajun taishich gard raeepari?
40. Vyarth he sarech taho ek he dhyanat raho
41. Hi tarunai...
42. मैत्रिण
43. सफरचंद
44. एवढंच ना? एकटे जगू.. एवढंच ना?
45. धैर्य

46. दोघे...नकळते...
47.डोंगळ्याचं जीणं
48. बुंबुंबा
49. चौथी भिंत...
50. हरकत नाही
51. समुद्राकाठच्या कविता
52. किती ?
53. रात्र सुंदर, चंद्र सुंदर
54. बारीश
55. तुझ्या माझ्यासवे...
56. वेड लागलं
57. सुपरमॅन
58. कसा चंद्र! कसं वय
59. तुजवरी लावला जीव
60. स्वर टिपेचा...
61. आता पुन्हा पाऊस येणार....
62. आज मी आयुष्य माझे चाचपाया लागलो
63. गीत माझ्या लेखणीचे एवढे भिनले तिला ;
64. इतकी नाजुक इतकी आल्लाड फुल्पखाराहून अलवार
65. तुझे नी माझे नाते काय?...
66. kadhitari vedyagat vagayla have
67. बंद तटांशी या लाटांशी कधी थाबती पाय
68. म्हणून आम्ही जन्मा आलो!
69. काय रे देवा
70. उफराटे हिशोब माझे
71. देतंय कोण
72. dislis varyamadhe, apulyach toryamadhe -
73. saaheb mhanto chepen chepen
74. he bhalte avaghad aste
75. deva mala roz ek apghat kar
80. प्रेमात म्हणे कुणी हुरहुरते कुणी मोहरते राणी
81. पाऊस असा रुणझूणता
82. मैत्रिण
83. लव्हलेटर.....
84. उशीरा उशीरा
85. जोखीम
86. म्हातारपण
87. सा रे ग म प
88. ही कागदाची होडी
89. एखाद्या खलनायकासारखे
90. हाताला धरून, मुसळाशेजारी बसवून, म्हणाली कविता
91. खडक
92. प्रेम नाही; हवी असते एक जखम फक्त
93. मी मोर्चा नेला नाही
94. मन तळ्यात मल्यात जाईच्या कल्यात
95. येईन स्वप्नात मिटल्या डोळ्यात घेशील का मला??
96. कविता

97. क्षणात लपून जाशी क्षणात दिसून
98. किती झाले.. ?
99. तो प्रवास कसला होता..........
100. क्षितिजाच्या पार
101. या जमिनीत एकदा स्वतःला गाडून घेईन म्हणतो
102. देते कोण
103. व्यर्थ हे सारेच टाहो, एक हे ध्यानात राहो,
104. दिवस असे की
105. अफाट होती तुझी स्मरणशक्ती
106. राधे रंग तुझा गोरा,

# Blank Call

हल्ली असा अवेळीच येतो कधी फोन
आणि कळतच नाही बोलतय कोण
बोलतच नाही मुळी पलीकडे कोणी
ऐकू येत रहात फ क्तडोळ्यातलंपाणी ...(१)

कळताच मलाही मग थोडंसं काही
मीही पुढे मग बोलतंच नाही
फोनच्या तारेतून शांतता वाहते
खूप खूप आतून अजून काही सांगते ...(२)

नदी नि शेत ि नवाऱ्याचीगिरकी
ढगाची विजेन घ` `तलेलीफिरकी
वाळूवर काढलेली पाण्याची चित्रं
"तुझा" पुढे मी खोडलेला "मित्र" ...(३)

टपला नि खोड्या नि रुसवे नि राग
एकदा तरी सहज म्हणून शहाण्यासारखं वाग
हसायचे ढीगभर नि लोळून लोळून
बोलायचे थोडेच पण घोळून घोळून...(४)

वडाचे झाड आणि बसायला पार
थंडीमधे काढायची उन्हात धार
कॉफी घेउन थोडेसे बोलायचे कडू
हसताना पहायचे येते का रडू ...(५)

बोलायचे गाणे आणि बोलायची चित्रं
नुसतीच सही करुन धाडायची पत्रं
क्षणांना यायची घुंगरांची लय
प्राणांना यायची कवीतेची सय...(६)

माणूस आहेस "गलत" पण लिहितोस "सही"
पावसात भिजलेली कवीतांची वही
पुन्हा नीट नव्यान ि ` ल हीतकानाहीस
काय रे.... काही आठवतय का नाही?
शब्दसुद्धा नाही तरी कळे असे काही
हातामधला हात सुद्धा जितकं बोलत नाही...(७)

हल्ली असा अवेळीच येतो कधी फोन
आणि कळतच नाही बोलतय कोण
दोन्ही कडे अबोला आणि मध्यात कल्लोळ
छाती मधे घुसमटतात हंबरड्यांची लोळ...(८)

ऐकू येतात कोंडलेले काही श्वास फक्त
कोणासाठीतरी खोल दुखलेलं रक्त
गरम होतात डोळे नि थरथरतो हात
सर्रकन निघते क्षणांची कात...(९)

उलटे नि सुलटे कोसळते काही
मुक्यानेच म्हणतो "नको... आता नाही"
फार नाही... चालतो मिनिटे अवघी तीन
तेवढ्यात जाणवतो जन्माचा शीण
तुटत गेले दोर आणि उसवत गेली वीण
डोळे झाले जुन त ` रीपाणी...न(बिच)

हल्ली असा अवेळीच येतो कधी फोन....

....संदिप

हसलो म्हणजे फ़क्त स्वतःच्या फ़जितीवर
निर्लज्यागत दिधली होती स्वतःच टाळी
हसलो कारण शक्यच नव्हते दुसरे काही
डोळ्यामधे पाणी नव्हते ऐसे नाही

हसतो कारण तुच कधी होतीस म्हणाली
याहुन तव चेहऱ्याला काही शोभत नाही
हसतो कारण तुला विसरणे जितके अवघड
तितके काही गाल पसरणे अवघड नाही

हसतो कारण दुसऱ्यानांही बरे वाटते
हसतो कारण तुला सुद्धा ते खरे वाटते
हसलो म्हणजे फ़क्त डकवली फुले कागदी
आतुन आलो होतो बहरुन ऐसे नाही

हसतो कारण जरी बत्तीशी कुरुप आहे
खाण्याची अन दाखवण्याची एकच आहे
हसतो कारण सत्याची मज भिती नाही
हसतो कारण हसण्यावाचुन सुटका नाही....

"हसलो" च्या जागी "हसतो" नक्की कुठल्या कडव्यात सुरु होते यामध्ये confusion आहे....pls corr

ect if its wrong....

.....

बॉस .....
बॉस खुप उशिरापर्यंत थांबायचा आणि वैताग आणायचा...
लाल लाल कंटाळल्या डोळ्यांनी काम करत रहायचा...
आम्ही घरी निघालो की चुकचुकायचा...

मी लग्नाळलेला... वाटायचं- 'चांगलं घरी जायचं सोडून
कसलं हे उकरून उकरून काम करत रहाणं !'...

यथावकाश माझ लग्नझालं
नव्या नवलाईचे पक्षी घरटं सोडेना झाले...
बघता बघता 'अतिपरिचित' झाले....

आणि हळूहळू पंख सैलावत जाताना
घरटयाची हाक आत तेवढीशी तीव्र उरली नाही...

आता बॉसला 'थांब' सांगाव लागतनाही
केबिनमध्ये तो आणि केबिनबाहेर मी
एकमेकांना सोबत करत बसलेलो असतो...
कंटाळ्यातील भागीदारांच्या समजुतदारपणाने
घरी न जाता काम करत रहाण्याची 'अनिवार्यता'
दोघांनाही आता घट्ट धरून ठेवते...

उकरून उकरून काम करत प्रश्नांशी भांडत बसण्यापेक्षा
उकरून उकरून काम करणे सोपे असते,
हे निर्जन ऑफिसमधल्या सुन्न रात्रींशी
गुपचुप कबुल केलेए आहे मी ...

- संदिप खरे

हृदय फेकले तुझ्या दिशेने
झेलाया तू गेलीस पटकन्
गफलत झाली परि क्षणांची
पडता खाली फुटले खळ्कन्

हृदय फेकले तूही जेंव्हा
सुटले तेही,पडलेही पण
तुटले नाही-फुटले नाही
नाद निघाला केवळ खण्कन्

गोष्ट येवढी इथेच थांबे
अशा गोष्टींना नसतो नंतर
खळ्कन् आणि खण्कन् यांतील
कधी कुठे का मिटले अंतर

मन पोलादी नकोच तुजसम
असो असूदे काच जरीही
फुटून जाते क्षणी परंतु
गंजायाची भीती नाही

--- संदीप खरे.

आता उरले ना दिस; रूसण्याचे-भांडण्याचे,
क्षण क्षण हिरे-मोती; शेवटले वेचण्याचे ॥ धृ ॥

किती काळ रहायचे; मान-अपमानी दंग,
पहा लकाकेनभात ; कसा शेवटला रंग.
कोण जाणे कोण्या क्षणी; सारे सोडून जायचे,
क्षण क्षण हिरे-मोती; शेवटले वेचण्याचे ॥ १ ॥

जरी भांडलो-तंडलो; तरी तुझीया सोबती,
दिली दुर्दैवाला पाठ; अन् संकटाला छाती.
सारे कठीण; तुझीया सवे मृदूल व्हायचे,
क्षण क्षण हिरे-मोती; शेवटले वेचण्याचे ॥ २ ॥

काही उणे माझ्यातले; काही दुणे तुझ्यातले,
बघ शेवटास सारे; कसे सुखमय झाले.
जन्मी पुढल्याही होऊ; अजूनही ओळखीचे,
क्षण क्षण हिरे-मोती; शेवटले वेचण्याचे ॥ ३ ॥

कष्ट, ध्यास, त्रागा, प्रेम, जिद्द, तडजोड, भीती,
जे जे झरले ते पाणी; आणि उरले ते मोती.
येत्या उद्यान`जपावा; असा शिंपला व्हायचे,
क्षण क्षण हिरे-मोती; शेवटले वेचण्याचे ॥ ४ ॥

--- संदीप खरे.

आठवत ंतुला?

आठवत त ंुलात्याभेटीत

रिमझिम सरींनी छेडलं होतं .

भर दुपारी मला जणू

चांदण्यान व ` `ढलंहोतं

आठवत त ंुलात्याभेटीत

श्रावण धुंद बहरला होता .

ओल्या ॠतूत ओल्या स्पर्शाने

ओला देह शहारला होता .

आठवत त ंुलात्याभेटीत

दोघे व्याकुळ झालो होतो .

तुझा गंध वेचता वेचता

मीही बकुळ झालो होतो .

आठवत त ंुलात्याभेटीत

भावनांनी कविता रचली होती .

माझ्या डोळ्यात तू अन

तुझ्या डोळ्यात मी वाचली होती.

आठवत त ंुलात्याभेटीत

आणखी काय घडलं होतं ?

मला स्मरत नाही पुढचं

बहुतेक तेव्हाच स्वप्न मोडलं होतं .

- संदिप खरे

अजुन तरी रुळ सोडुन सुटला नाही डब्बा

अजुन तरी रुळ सोडुन सुटला नाही डब्बा
अजुन तरी नाही आमच्या चारित्र्यावर धब्बा ॥धृ॥

आमच्या देखिल मनी आले चांदण्याचे पुर
आम्हालाही दिसल्या शम्मा अन शम्मेचे नूर
अजुन तरी परवाना हा शम्मेपासुन दुर
मैत्रिणीच्या लग्ना गेलो घालुन काळा झब्बा
अजुन तरी नाही आमच्या चारित्र्यावर धब्बा ॥१॥

कुणी नजरेचा ताणुन बाण केलेली जखमी
कुणी ओठांची नाजुन अस्त्रे वापरली हुकमी
अन शब्दांचे जाम भरुन पाजियेले कोणी
मयखान्यातही स्मरले आम्हा मंदिर मस्जिद काबा
अजुन तरी नाही आमच्या चारित्र्यावर धब्बा ॥२॥

कधी गोडीन ग` ा उगेलोजोडीनेगाणी
रमलो हे जरी विसरुन सारे आम्ही खुळ्यावानी
सर्वस्वाचे घेउनी दान आ` लेजरीकुणी
अजुन तरी सुटला नाही हातावरचा ताबा
अजुन तरी नाही आमच्या चारित्र्यावर धब्बा ॥३॥

कोण जाणे कोण मजला रोखुन हे धरते
वाटा देती हाका तरिही पाउल अडखळते
कुठल्या शपथेसाठी माझी ओंजळ थरथरते
मोहाहुन ही मोहक माझी हुरहुरण्याची शोभा
अजुन तरी नाही आमच्या चारित्र्यावर धब्बा ॥४॥

अजुन तरी रुळ सोडुन सुटला नाही डब्बा
अजुन तरी नाही आमच्या चारित्र्यावर धब्बा ...

हे गंधित वारे फिरणारे
घन झरझर उत्कट झरणारे . . .
हे परिचित सारे पूर्वीचे . . .
तरी आता त्याही पलिकडचे . . .
बघ मनात काही गजबजते . . .
क्षणाक्षणाच्या दिव्यादिव्यातून अत्तर जळते रे
उमजत नाही ओढ कुणाची सुखवित सलते रे . . .
हे गंधित वारे फिरणारे घन झरझर उत्कट झरणारे . . .

कुठल्या देशी नकळत माझे पाऊल पडले रे
सूर रोजचे कसे नव्यान म` नासभिडलेरे
हे गीत जयाला पंखसुध्दा . . .
अन हवाहवासा डंखसुध्दा . . .
कधि शंकित अन नि:शंकसुध्दा . . .
क्षणाक्षणाच्या दिव्यादिव्यातून अत्तर जळते रे
उमजत नाही ओढ कुणाची सुखवित सलते रे . . .
हे गंधित वारे फिरणारे घन झरझर उत्कट झरणारे . . .

मनात जे जे दडून होते नकळत आकळते
कसे दुज्याच्या स्पर्शाने 'मीपण' झगमगते
ही जाणीव अवघी जरतारी . . .
हर श्वासातुन परिमळणारी . . .
हर गात्रातुन तगमगणारी . . .
क्षणाक्षणाच्या दिव्यादिव्यातून अत्तर जळते रे
उमजत नाही ओढ कुणाची सुखवित सलते रे . . .
हे गंधित वारे फिरणारे घन झरझर उत्कट झरणारे . . .

नाव न उरले, गाव न उरले, अवघे ओसरले
बेभानाचे भान जिण्याला बिलगुन बसलेले
हा स्पर्श विजेच्या तारांचा . . .
हा उत्सव बघ अस्वस्थाचा . . .
हा जीव न उरला मोलाचा . . .
क्षणाक्षणाच्या दिव्यादिव्यातून अत्तर जळते रे
उमजत नाही ओढ कुणाची सुखवित सलते रे . . .
हे गंधित वारे फिरणारे घन झरझर उत्कट झरणारे . . .

-संदिप खरे

दुपार . . .

अशी दुपारली वेळ, नभी भरलेल्या सरी

जीव घेत घेत माझा कोण उभे माझ्या दारी

किती जपून ठेवले गुज ओठावर आले

साऱ्या सयीचे वऱ्हाड मेघा का रे बोलवले ?

दूर वाजते सनई तिला आभाळ पुरेना

मनातली हुरहुर जशी मनात मावेना

माझ्या मनात मांडव असा सहजी पडेना

आर्त मनाचे मनाचे जगभर सांगवेना

आता तरी दे ना दे ना मनातले आवताण

मनातल्या माणसाला येवो माझ्या देहभान

आता येथोनीच थांब नको मनभर होऊ

माझ्या कोशात मी बरा तिथे हाक नको देऊ

हाकेतुन तरी काय ? स्वर पाण्याचा पाण्याचा

तुझे आकाश पाण्याचे . . माझा डोळाही पाण्याचा

इथे पाणी तिथे पाणी . . एवढेच ना करणे

उन्हे पडल्यावरती पुन्हा भाजुन निघणे . . .

आता अंथरून वेळ पुन्हा पाय पसरीन

आणि कोसळता सरी आत आत पाझरीन. . .

- संदिप खरे

जरा चुकीचे... जरा बरोबर......
जरा चुकीचे, जरा बरोबर , बोलू काही.....
चला दोस्त हो ; आयुष्या वर बोलू काही......

उगाच वळसे शब्दांचे हे देत रहा तू ..
उगाच वळसे शब्दांचे हे देत रहा तू ....
भीडले नाहीत डोळे तोवर , बोलू काही......
चला दोस्त हो ; आयुष्या वर बोलू काही..........

तूफान पाहून तीरा वर , कुजबुज्ल्या होडया ..
तूफान पाहून तीरा वर , कुजबुज्ल्या होडया ....
पाठ फीरू दे त्याची, नंतर बोलू काही........
चला दोस्त हो ;आयुष्या वर बोलू काही..........

हवे-हवे से दुखः तुला जर, हवेच आहे ..
हवे-हवे से दुखः तुला जर, हवेच आहे ....
नको-नको से हळवे कातर, बोलू काही.......
चला दोस्त हो ; आयुष्या वर बोलू काही..........

"उदया-उदया" ची कीती काळजी , बघ रांगेतुन..
"उदया-उदया "ची कीती काळजी , बघ रांगेतुन....
"परवा" आहे "उदया"च नंतर, बोलू काही........
चला दोस्त हो ; आयुष्या वर बोलू काही..........

श्ब्द असू दे हातां मध्ये, काठी म्हनुनी..
श्ब्द असू दे हातां मध्ये, काठी म्हनुनी....
वाट आंधळी, प्र्वास खडतर ,बोलू काही .......
चला दोस्त हो , आयुष्या वर बोलू काही..........

चला दोस्त हो , आयुष्या वर बोलू काही..........

* संदीप खरे

मेघ नसता वीज नसता, मोर नाचु लागले,
ज़ाहले इतुकेच होते कि तुला मी पाहिले

गोरट्या गालावरी का चोरटा हा रक्तिमा,
तू मला चोरून बघताना तुला मी पाहिले

एवढे नाजूक आहे वय तुझे माझ्या फुला ,
रंग देखील पाकळ्यांवर भार वाटू लागले

लाख नक्षत्रे उराशी नभ तरीही हळहळे,
हे तुझे नक्षत्र वैभव का धरे वर राहिले ?

पाहता तुज रंग उडुनी होई गजरा पांढरा
शल्य हे त्याच्या उरातील बघ सुगंधू लागले
भर पहाटे मी फुलांनी दृष्ट काढून टाकली ,
पाहती स्वप्नी तुला जे भय तयांचे वाटले

मेघ नसता वीज नसता, मोर नाचु लागले,

ज़ाहले इतुकेच होते कि तुला मी पाहिले

- संदिप खरे

नसतेस घरी तू जेव्हा
जीव तुटका तुटका होतो
जगण्याचे विरती धागे
संसार फाटका होतो

नभ फाटून वीज पडावी
कल्लोळ तसा ओढवतो
ही धरा दिशाहीन होते
अन् चंद्र पोरका होतो

येतात उन्हे दाराशी
हिरमुसून जाती मागे
खिडकीशी थबकुन वारा
तव गंधावाचून जातो

तव मिठीत विरघळणाऱ्या
मज स्मरती लाघववेळा
श्वासाविण ह्रुदय अडावे
मी तसाच अकंतिक होतो

तू सांग सखे मज काय
मी सांगू या घरदारा ?
समईचा जीव उदास
माझ्यासह मिणमिण मिटतो

ना अजून झालो मोठा
ना स्वतंत्र अजुनी झालो
तुजवाचून उमगत जाते
तुजवाचून जन्मच अडतो !

गीत - संदीप खरे

करु वाटे खरे तर तुला एक फोन
यावा वाटे खरे तर तुझा एक फोन
असे काही होत नाही मग उगाचच
याला कर फोन कधी त्याला कर फोन

फोन तुझा सदा चालू कधी बंद नाही
आणि त्याला तारेचाही आता बंध नाही
पक्षापरी निरोपांची हवेतून ये-जा
हातातून तो ही परी झेपावत नाही
हातामध्ये फोन तरी प्रश्ण एवढाच
बोलायचे काय आणि बोलणार कोण

कसा बघ फोन माझा गावोगाव फ़िरे
हातातल्या हातामध्ये एकटाच झुरे
ह्रदयात साठवल्या काही जुन्या खुणा
टाकवेना फोन बाई जरी झाला जुना
पुन्हा पुन्हा करतो मी बटणाशी चाळा
पुन्हा पुन्हा बदलतो रींगरचा टोन !

खिडकीत साधुनिया सिग्नलचा कोन
कसे कसे किती किती बोलायचा फोन!
आता कसा उगामुगा वरवर बोले
जिभेवर जसे काही त्याच्या वारे गेले !
गोड गोड बोलायला एकटा मी पुरे
भाडायला तरी सखे लागतात ना दोन !

कितीक् हळवे , कितीक् सुंदर , किती शहाणे आपूले अंतर...
त्याच जागी त्या येऊन जाशी, माझ्यासाठी... माझ्यानंतर...
कितीक् हळवे , कितीक् सुंदर ...

अवचीत कधी सामोरे यावे...
अन् श्वासांनी थांबून जावे...
परस्परांना त्रास तरीहि, परस्पराविण ना गत्यंतर...

कितीक् हळवे , कितीक् सुंदर , किती शहाणे आपूले अंतर...

मला पाहुनी... दडते-लपते,
आणिक तरीहि... इतूके जपते ...
वाटेवरच्या फुलास माझ्या ... लावून जाते हळूच फत्तर

भेट जरी ना ह्या जन्मातुन,
ओळख झाली इतकी आतून...
प्रश्न मला जो पडला नाही... त्याचेही तुझ सुचते उत्तर

कितीक् हळवे , कितीक् सुंदर , किती शहाणे आपूले अंतर...

मला सापडे तुझे तुझेपण,
तुझ्या बरोबर माझे मीपण...
तुला तोलुनी धरतो मि अन्, तु ही मजला सावर ्सावर...

कितीक् हळवे , कितीक् सुंदर , किती शहाणे आपूले अंतर...

मेघ कधी हे भरुन येता,
आबोल आतून घुसमट होता...
झरते तिकडे पाणि टप् टप्... अन् इकडेही शाई झर ्झर्...

कितीक् हळवे , कितीक् सुंदर , किती शहाणे आपूले अंतर...
त्याच जागी त्या येऊन जाशी... माझ्यासाठी... माझ्यानंतर...
किती शहाणे आपूले अंतर...

- संदिप खरे

apratim gazal aahe hee 1

जुबा तो डरती है कहन`से
पर दिल जालीम कहता है
उसके दिल में मेरी जगह पर
और ही कोई रहता है ॥ धृ ॥

बात तो करता है वोह अब भी
बात कहाँ पर बनती है
आदत से मैं सुनती हूँ
वोह आदत से जो कहता है ॥ १ ॥

दिलमें उसके अनजाने
क्या कुछ चलता रहता है
बात बधाई की होती है
और वोह आखें भरता है ॥ २ ॥

रात को वोह छुपकेसे उठकर
छतपर तारे गिनता है
देख के मेरी इक टुटासा
सपना सोया रहता है ॥ ३ ॥

दिलका क्या है,
भर जाये या उठ जाये,
एक ही बात...
जान य` ाअनजाने
शिशा टूटता है तो टूटता है ॥ ४ ॥

* संदीप खरे *

मी हजार चिंतांनी हे डोकेखाजवतो ,
तो कट्ट्यावर बसतो, घुमतो, शीळ वाजवतो.

मी जुनाट दारापरी किरकिरा बंदी,
तो सताड उघड्या खिडकीपरी स्वछंदी,
मी बिजागरीशी जीव गंजवीत बसतो,
तो लंघुन चौकट पार निघाया बघतो.

डोळ्यात माझीया सुर्याहुनी संताप,
दिसतात त्वचेवर राप उन्हाचे शाप,
तो त्याच उन्हाचे झगझगीत लखलखते,
घड्वून दागिन स ` ुर्यफुलांपरीझुलतो

मी पायीरुतल्या काचांवरती चिडतो,
तो त्याच घेऊनी नक्षी मांडून बसतो,
मी डाव रडीचा खात जिंकतो अंती,
तो स्वच्छ मोकळ्या मुक्त मनन`हरतो.

मी आस्तिक मोजत पुण्याईची खोली,
नवसांची ठेवून लाच लावतो बोली,
तो मुळात येतो इच्छा अर्पून साऱ्या
अन धन्यवाद देवाचे घेवून जातो.

मज अध्यात्माचा रोज नवा शृंगार,
लपतो न परि चेहरा आत भेसूर,
तो फक्त ओढतो शाल नभाची तरीही,
त्या शाम निळ्याच्या मोरपीसापरि दिसतो

आताशा.. असे हे.. मला काय होते!!!
कुण्या काळचे , पाणी डोळ्यात येते.....
बरा बोलता बोलता , स्तब्ध होतो...
कशी शांतता , शून्य शब्दांत येते.......
आताशा.. असे हे .. मला काय होते!!!
कुण्या काळ चे , पाणी डोळ्यात येते!!!

कधी दाटु येता , पसारा घनांचा....
कसा सावला रंग , होतो मनाचा...
असे हालते .. आत हलुवार काही...
जसा सप्र्श पाण्यावरी चाँदण्याचा....

असा ऐकू येतो , क्षणाचा इशारा ...
क्षणी व्यरथ होतो ... दीशांचा पसारा...
नभातुन ज्या .. रोज जातो बुडूनी..
नभाशीच त्या... मागु जातो कीनारा....

न अंदाज कुठले .. न अवधान काही....
कुठे जायचे , यायचे भान नाही..
जसा गंध नीघतो, हवेच्या प्रवासा
न कुठले नकाशे .. न अनुमान काही....

कशी ही अवस्था.. कुणाला कलावे ..
कुणाला पुसावे .. कुणी उत्तरावे ...
कीती खोल जातो, तरी तोल जातो...
असा तोल जाता.. कुणी सावरावे ....

आताशा .. असे हे ..मला काय होते ....
कुण्या काळ चे ,पाणी डोळ्यात येते....
बर बोलता बोलता , स्तब्ध होतो.
कशी शांतता शून्य शब्दांत येते...

आताशा असे हे मला काय होते ....
कुण्या काळ चे पाणी डोळ्यात येते .....

उत्कट-बित्कट होऊ नये, भांडू नये, तंडू नये..
असे वाटते आज-काल, नवे काही मांडू नये

नको कुठला नवा भार , जुनेच गुंते शिल्लक फार..
सूर गाठ-नीर गाठ, राहून द्याव्यात, ओढू नये...
असे वाटते आज-काल, नवे काही मांडू नये

असे वाटते बसून घ्यावे, उरले श्वास मोजत रहावे..
जन्मा-बिन्मा आलो त्याचे, पांग सुद्धा फेडू नये ...
असे वाटते आज-काल, नवे काही मांडू नये

शिंकांसारखे सोपस्कार, मला झालीये गर्दी फार..
असल्या गळक्या जगण्यासाठी, रूमालसुद्धा काढू नये...
असे वाटते आज-काल, नवे काही मांडू नये

कुठे कधी रमला जीव , खरंच फार दमला जीव..
वजन, ज्ञान, ओळख, पित्त काही-काही वाढू नये...
असे वाटते आज-काल, नवे काही मांडू नये

कसले प्रहर, कसला काळ, मनात कायम संध्याकाळ..
तिच्या कुशीत मांडली कविता , तेवढी मात्र मोडू नये...
असे वाटते आज-काल, नवे काही मांडू नये ॥ ७ ॥

दिवानों की बाते है
इनको लबपर लाये कौन ?
इतना गेहेरा जाये कौन ?
खुदको यु उलझाये कौन ?

जो तु समझा अपना था
वो लमहों का सपना था
हमन ि दलकोसमझाया
अब हमको समझाये कौन ?

तेरी गली मे हो आये
होश वही खो जाये
दिख जाये अगर तू पलभर
मैखान म ` `जाये?कौन

गली गली मे फ़िरते है
कई ठोकरें खाते है
जब तुनेही ठुकराया हमे
अब हमको अपनाये कौन ?

दिवानो की बाते है

दाढी काढून पाहिला आन् दाढी वाढून पाहिला
चेहरा कंटाळवाणा पण अबाधित राहिला

मी सिनेमाला जरी सुरुवातीला कंटाळा लो
फक्त पैसे वसूल व्हावे म्हणून शेवट पाहिला

चार मिळता चार लिहिली ना कमी ना जास्त ही
प्रेमपात्रा ना ही कागद रद्धीचा मी शोधला

नामस्मरणाला सुद्धा दिधली ठराविक वेळ मी
मी किलो आन् ग्रॅम वरती मोक्ष मोजून घेतला

लाल हिरवे दीप येथे पाप पुण्याचे उभे
सोयीचा जो वाटला मी तोच सिग्नल पाळला

मी धुके ही पाहिले आन् धबधबे ही पाहिले
पण तरी मी शेवटी माझाच फोटो काढला

मी पिझ्झा ही चापतो आन् भाकरी ही हाणतो
घास जो पडला मुखी मी तो रवन्थत ठेवला

भोगताना योग स्मरला योगताना भोग रे
राम ही ना झेपला मज कृष्ण ही ना झेपला

मी मला दिसलो असा की ना जसा दिसलो कुणा
कुरूपतेचा आळ कायम आरशावर ठेवला

नास्तिक

एक खरा खुरा नास्तिक जेव्हा देवळाबाहेर थाबतो
तेव्हा खर तर गाभा-यातच भर पडत असते
की कोणीतरी आपल्यापुरता सत्याशी का होईना,
पण प्रामाणिकपणे चिकटुन राहिल्याच्या पुण्याईची !

एक खरा खुरा नास्तिक जेव्हा देवळाबाहेर थाबतो
तेव्हा होते निर्माण
देवान आ ` प ल ाआळसझटकूनदेवळाबाहेरयेण्याची

एक खरा खुरा नास्तिक जेव्हा देवळाबाहेर थाबतो
तेव्हा को-या नजरेन प ` ाहतराहतो
सभोवतालच्या हालचाली, भाविकाच्या जत्रा...
कोणीतरी स्वत:चे ओझे , स्वत:च्याच पायावर
साभाळत असल्याचे समाधान लाभते देवलाच !

म्हणून तर एक खरा खुरा नास्तिक जेव्हा देवळाबाहेर थाबतो
तेव्हा देवाला एक भक्त कमी मिळत असेल कदचित !
पण मिळते आकठ समाधान एक सहकारी लाभल्याचे

देऊळ बद झाल्यावर एक मस्त आळस देउन
बाहेर ताटकळलेल्या नास्तिकाशी गप्पा मारता मारता
देव म्हणतो, " दर्शन देत जा अधुन मधुन........
तुमचा नसेल विश्वास आमच्यावर,
पण आमचा तर आहे ना ! "

देवळाबाहेर थाबलेला एक खरा खुरा नास्तिक
कटाळलेल्या देवाला मोठ्या मित्रत्वारिन प` ाठवतोदेवळात
तेव्हा कुठे अनंत वर्षे आपण घेऊ शकतो दर्शन
अस्तिकत्वाच्या भरजरी शालीत गुदमरलेल्या देवाचे....

हे भलते अवघड असते

गाडी सुटली, रुमाल हलले, क्षणात डोळे टचकन् ओले
गाडी सुटली, पडले चेहरे, क्षण साधाया हसरे झाले
गाडी सुटली, हातामधुनी हात कापरा तरी सुटेना
अंतरातली ओली माया तुटूदे म्हटले तरी तुटेना
का रे इतका लळा लावुनी नंतर मग ही गाडी सुटते
डोळ्यांदेखत सरकत जाते आठवणींचा ठिपका होते
गाडी गेली फलाटावरी नि:श्वासांचा कचरा झाला
गाडी गेली डोळ्यामधल्या निर्धाराचा पारा फुटला

हे भलते अवघड असते... हे भलते अवघड असते...
कुणी प्रचंड आवडणारे ... ते दूर दूर जाताना...
डोळ्यांच्या देखत आणि नाहीसे लांब होताना...
डोळ्यातील अडवून पाणी... हुंदका रोखुनी कंठी...
तुम्ही केविलवाणे हसता अन् तुम्हास नियती हसते ...

तरी असतो पकडायाचा... हातात रुमाल गुलाबी...
वाऱ्यावर फडकवताना... पाह्यची चालती गाडी...
ती खिडकीतून बघणारी अन् स्वतः मधे रमलेली...
गजरा माळावा इतुके... ती सहज अलविदा म्हणते...

तुम्ही म्हणता मनास आता, हा तोडायाचा सेतू...
इतक्यात म्हणे ती - माझ्या कधी गावा येशील का तू?
ती सहजच म्हणुनी जाते... मग सहजच हळवी होते...
गजऱ्यातील दोन कळ्या अन् हलकेच्च ओंजळीत देते ...

कळते की गेली वेळ... ना आता सुटणे गाठ...
आपुल्याच मनातील स्वप्ने... घेऊन मिटावी मूठ...
ही मूठ उघडण्यापूर्वी... चल निघुया पाऊल म्हणते...
पण पाऊल निघण्यापूर्वी... गाडीच अचानक निघते...

परतीच्या वाटेवरती गुदमरून जड पायांनी...
ओठावर शीळ दिवाणी... बेफिकीर पण थरथरती...
पण क्षण क्षण वाढत असते... अंतर हे तुमच्यामधले...
मित्रांशी हसतानाही... हे दु:ख चरचरत असते...

हे भलते अवघड असते....

नामंजूर

जपत किनारा शीड सोडणे - नामंजूर!
अन वाऱ्याची वाट पहाणे - नामंजूर!
मी ठरवावी दिशा वाहत्या पाण्याची
येईल त्या लाटेवर डुलणे  - नामंजूर!

मला ऋतुंची साथ नको अन् कौल नको
मला कोठल्या शुभशकुनांची झूल नको
मुहुर्त माझा तोच ज्याक्षणी हो इच्छा
वेळ पाहुनि खेळ मांडणे - नामंजूर!

माझ्याहाती विनाश माझा! कारण मी!
मोहासाठी देह ठेवतो तारण मी!
सुंदरतेवर होवो जगणे चक्काचूर
मज अब्रूचे थिटे बहाणे - नामंजूर!

रुसवे - फुगवे ... भांडणतंटे... लाख कळा
आपला - तुपला हिशेब आहे हा सगळा
रोख पावती इथेच द्यावी अन् घ्यावी
गगनाशी नेणे गाऱ्हाणे - नामंजूर!

नीती, तत्वे... फ़सवी गणिते! दूर बरी!
रक्तातील आदिम जिण्याची ओढ खरी!
जगण्यासाठी रक्त वहाणे मज समजे,
पण रक्ताचा गर्व वाहणे - नामंजूर!

कसे सरतील सये...

कसे सरतील सये, माझ्याविना दिस तुझे
सरताना आणि सांग सलतील ना
गुलाबाची फुलं दोन रोज रात्री डोळ्यांवर
मुसुमुसु पाणी सांग भरतील ना, भरतील ना...

पावसाच्या धारा धारा मोजताना दिस सारा
रिते रिते मन तुझे उरे
ओठ वर हसे हसे उरातून वेडेपिसे
खोल खोल कोण आत झुरे
आता जरा अळिमिळी तुझी माझी व्यथा निळी
सोसताना सुखावुन हसशील ना,
गुलाबाची फुलं दोन...

कोण तुझ्या सौधातून उभे असे सामसूम
चिडीचुप सुनसान दिवा
आता सांज ढळेलच आणि पुन्हा छळेलच
नभातून गोरा चांदवा
चांदण्यांचे कोटी कण आठवांचे ओले सण
रोज रोज निजपर भरतील ना,
गुलाबाची फुलं दोन...

इथे दूरदेशी माझ्या सुन्या खिडकीच्या पाशी
जडेसर काचभर तडा
तूचतूच तुझ्यातुझ्या तुझीतुझी तुझेतुझे
सारासारा तुझा तुझा सडा
पडे माझ्या वाटेतून आणि मग काट्यातून
जातानाही पायभर मखमल ना,
गुलाबाची फुलं दोन...

आता नाही बोलायाचे जरा जरा जगायाचे
माळूनिया अबोलीची फुले
देहभर हलू देत विजेवर झुलू देत
तुझ्या माझ्या विरहाचे झुले
जरा घन झुरु दे ना वारा गुदमरु दे ना
तेव्हा नभ धरा सारी भिजवील ना,

गुलाबाची फुलं दोन रोज रात्री डोळ्यांवर
मुसुमुसु पाणी सांग भरतील ना, भरतील ना...

## मी मोर्चा नेला नाही

मी मोर्चा नेला नाही, मी संपही केला नाही
मी निषेध सुद्धा साधा, कधी नोंदवलेला नाही

भवताली संगर चाले, तो विस्फ़ारुन बघताना
कुणी पोटातून चिडताना , कुणी रक्ताळून लढताना
मी दगड होउनी थिजलो, रस्त्याच्या बाजूस जेव्हा
तो मारायाला देखिल, मज कुणी उचलले नाही

नेमस्त झाड मी आहे, मूळ फ़ांद्या जिथल्या तेथे
पावसात हिरवा झालो, थंडीत झाडली पाने
पण पोटातून कुठलीही , खजिन्याची ढोली नाही
कुणी शस्त्र लपवले नाही , कधी गरूड बैसला नाही

धुतलेला सातिव सदरा, तुटलेली एकच गुंडी
टकलावर अजून रुळते, अदृश्य लांबशी शेंडी
मी पंतोजींना भ्यालो, मी देवालाही भ्यालो
मी मनात सुद्धा माझ्या, कधी दंगा केला नाही

मज जन्म फ़ळाचा मिळता, मी केळे झालो असतो
मी असतो जर का भाजी, तर भेंडी झालो असतो
मज चिरता चिरता कोणी, रडले वा हसले नाही
मी कांदा झालो नाही, आंबाही झालो नाही

सरीवर सर...

दूर दूर नभपार डोंगराच्या माथ्यावर
निळे निळे गार गार पावसाचे घरदार
सरीवर सर..

तडा तडा गार गारा गरा गरा फ़िरे वारा
मेघियाच्या ओंजळीत वीज थिजलेला पारा
दूरवर रानभर नाचणारा निळा मोर
मोरपीस मखमल उतू गेले मनभर
सरीवर सर..

थेंब थेंब मोती ओला थरारत्या तनावर
शहाऱ्याचे रान आले एका एका पानावर
ओल्या ओल्या मातीतून भिजवेडी मेघधून
फ़िटताना नवे ऊन झाले पुन्हा नवथर
सरीवर सर..

उधळत गात गात पाय पुन्हा परसात
माती मऊ काळी साय हूर हूर पावलात
असे नभ झरताना घरदार भरताना
आले जल गेले जल झाले जल आरपार
सरीवर सर..

अशा पावसात सये व्हावे तुझे येणेजाणे
उमलते ओले रान रान नव्हे मन तुझे
जशी ओली हूर हूर तरारते रानभर
तसे नाव तरारावे मझे तुझ्या मनभर

लागते अनाम ओढ श्वासाना
येत असे उगाच ओठाना
होई का असे तुलाच स्मरताना.....
( तनन धुम तेरेना तेरेना तनन धुम तेरेना तेरेना तनन धुम तेरेना तेरेना )

एकांती वाजतात पैजणे
भासांची हालतात कंकणे
कासावीस आसपास बघताना.....
तनन धुम तेरेना तेरेना तनन धुम तेरेना तेरेना तनन धुम तेरेना तेरेना )

मी असा जरी निजेस पारखा
रात्रीला टाळतोच सारखा
स्वप्न जागती उगाच निजताना.....
( तनन धुम तेरेना तेरेना तनन धुम तेरेना तेरेना तनन धुम तेरेना तेरेना )

आज काल माझाही नसतो मी
सर्वातुन एकटाच असतो मी
एकटेच दूर दूर फ़िरताना.....
( तनन धुम तेरेना तेरेना तनन धुम तेरेना तेरेना तनन धुम तेरेना तेरेना )

दूरदेशी गेला बाबा... गेली कामावर आई
नीज दाटली डोळ्यात , परि घरी कुणी नाही !! ध्रु !!

कसा चिमणासा जीव , कसाबसा रमवला
चार भिंतित धावुन दिसभर दमवला
' आता पुरे ! झोप सोन्या..' कुणी म्हणतच नाही !! १ !!

कशासाठी कोण जाणे देती शाळेमध्ये सुट्टी ?
कोणी बोलायाला नाही...कशी व्हावी कट्टी-बट्टी ?
खेळ ठेवले मांडून ... परि खेळगडी नाही !! २ !!

दिसे खिडकीमधुन जग सारे , दिशा दाही
दार उघडुन तरी तिथे धावायचे नाही
फार वाटे जावे परी - मुठीमध्ये बोट नाही !! ३ !!

नीज दाटली डोळ्यात , परि घरी कुणी नाही
दूरदेशी गेला बाबा......

करार

चल आता बोलुन घेऊ ! बोलुन घेऊ थोडे !

सुकण्याआधी माती आणि जाण्याआधी तडे !

संपत आलाय पाऊसकाळ ! विरत चाललेत मेघ !

विजेचीही आता सतत उठ्त नाही रेघ !

मृदगंधान आ ` व रुनघेतलायधुंदावण्याचाखेळ

मोरपंखी पिसऱ्यांनी ही मिटण्याची वेळ !

सावाळ्या हवेत थोड ि ॱ म !सळ्तचाललंयउन्ह

खळखळणार्री नदी आता वाहते जपून जपून !

चल आता बोलुन घेऊ ! बोलुन घेऊ थोडे !

लक्षात ठेव अर्थांपेक्षा शब्दच असतात वेडे !

मनामधला कानाकोपरा चाचपून घे नीट !

लपले असतील अजुन कोठे चुकार शब्द धीट !

नजरा, आठवण, शपथा . . . साऱ्यांस उन्ह द्यायला हवे !

जाणयाधी ओले मन वाळायला तर हवे !

हळवी बिळवी होत पाहू नकोस माझ्याकडे

माझ्यापेक्षा लक्ष दे माझ्या बोलण्याकडे

भेटण्याआधीच निश्चित असते जेव्हा वेळ जायची !

समजुतदार मुलांसारखी खेळणी आवरून घ्यायची !

एकदम कर पाठ आणि मन कर कोरे !

भेटलो ते ही बरे झाले ! चाललो ते ही बरे !

मी ही घेतो आवरून सारे ! तू ही सावरून जा !

तळहातीच्या रेषांमधल्या वळणावरून जा !

खुदा-बिदा असलाच तर मग त्यालाच सोबत घे !

' करार पूर्ण झाला ' अशी तेवढी दे !

- मौनाची भाषांतरे, संदिप खरे

आयुष्यावर बोलू काही या कवितेमधील सीडी मध्ये नसलेली काही कडवी...

I am not sure if all of them are by Sandeep, but most of them are for s

कुणीच नाही बोलायाला त्याच्यासाठी
झुकून खाली म्हणते अंबर बोलू काही...

खर्ज बोलतो मनात ठेवून तार तमाशा
'मध्या'मध्ये ठेवूनिया स्वर बोलू काही...

रखरखीत हा रस्ता प्रवास करण्याचा
शेवट त्याचा मिळेल तोवर बोलू काही...

जग बदलाची कशास करता इतुकी घाई
आधी बदलू स्वतःस नंतर बोलू काही...

गल्ली मध्ये बोलायाचे कारण नाही
आयुष्याच्या हमरस्त्यावर बोलू काही...

तुमच्या संगे आज मलाही म्हणूदे गाणे
मिटवून सारे मधले अंतर बोलू काही...

(The following two are most likely not by sandeep...)

स्पर्श जरी हे खरे बोलके असती तरीही
करून मौनाचे भाषांतर बोलू काही...

आभाळातून टपटपणारा थेंब टपोरा
मातीचा दरवळ सुटताना बोलू काही...

ꞩure.

आता आठवतायत ते फक्त काळेभोर डोळे...
बाकी सारे आकार, उकार, होकार, नकार...
मागे पडत चाललेल्या स्टेशनांसारखे
मागे मागे जात जात पुसटत चालले आहेत...
पुसत जावेत ढगांचे आकार
आणि उराव ए कसंध,आभाळभूतकाळ
त्याच्या छातीवर गवताची हिरवीगार कुरणं,
भरून आलेली गाफील गाणी, काळेसावळे ढग
आणि पश्चिमेच्या वक्षाकडे रोखलेले बाणाकृतीतील बगळे
आता आठवतायत ते फक्त काळेभोर डोळे...

बंध रेशमी तुझ्यासवे जे जुळले
अन् क्षितिजावर रंग नवे अवतरले
घन दाटताच एका क्षणात हे रंगबंध विस्कटले...तुटले....

विसरत चाललोय... नावेतून उतरताना आधारासाठी धरलेले हात
विसरत चाललोय होडीची मनोगते, सरोवराचे बहाणे,
वा नावेला नेमका धक्का देणारी ती अज्ञात लाट
ती लाट तर तेव्हाच पुसली... मनातल्या इच्छेसारखी
सरोवर मात्र अजूनही तिथेच...
पण त्याच्याही पाण्याची वाफ किमान चारदा तरी आभाळाला भिडून आलेली
आता तर लाटा नव्हे, पाणी सुद्धा नवंय कदाचित
पण तरीही जुन्याच नावान स रोवरालाओळखतायतसगळे
आता आठवतायत ते फक्त काळेभोर डोळे...

क्षण दरवळत्या भेटींचे, अन् हातातील हातांचे
ते खरेच होते सारे..वा मृगजळ हे भासांचे
सुटलेच हात आता मनात हे प्रश्न फक्त अवघडले...तुटले...

तुझ्याकडे माझी सही नसलेली एक कविता...मीही हट्टी...
माझ्याकडे तुझ्या बोटांचे ठसे असलेली काचेची पट्टी
चाचपडत बसलेले काही संकेत, काही बोभाटे...अजूनही...
थोडेसे शब्द, बरंचसं मौन...अजूनही...
बाकी अनोळखी होऊन गेलो आहोत...
तुझा स्पर्श झालेला मी, माझा स्पर्श झालेली तू...
आणि आपले स्पर्श झालेले हे सगळे...
आता आठवतायत ते फक्त काळेभोर डोळे...

मज वाटायाचे तेव्हा हे क्षितिजच आले हाती
नव्हताच दिशांचा दोष, अंतरेच फसवी होती...
फसवेच ध्यास फसवे प्रयास आकाश कुणा सापडले ...तुटले...

उत्तरे चुकू शकतात, गणित चुकत नाही...
पावले थकू शकतात, अंतरे थकत नाहीत...

वाळूवरची अक्षर प ं ुसटहोतजातात
डोळ्यांचे रंग फिकट होत जातात..
तीव्रतेचे उग्र गंध विरळ होत जातात..
शेपटीच्या टोकावरचे हट्ट सरळ होत जातात..
विसरण्याचा छंदच जडलाय आताशा मला..
या कवितांना, शहरभर पसरलेल्या संकेतस्थळांना ...
विसरत चालल्या आहेत..पत्ता न ठेवता निघून गेलेल्या वाटा..
विसरत चालले आहे तळ्यावर बसलेले पश्चिमरंगी आभाळ..
अन् विसरत चालले आहे...
आभाळही गोंदायला विसरणारे हिरवेगर्द तळे
आता आठवतायत ते फक्त काळेभोर डोळे...

मी स्मरणाच्या वाटांनी वेड्यागत अजून फिरतो
सुकलेली वेचीत सुमने, भिजणारे डोळे पुसतो...
सरताच स्वप्न अंतास सत्य हे आसवांत ओघळले...तुटले...

आता आठवतायत ते फक्त काळेभोर डोळे...

...

संदीप : या कवितेविषयी आधी थोडंसं सांगतो...की हातामधून हात सुटून जातो, पण जे काही थोडे क्षण एक

मी फसलो म्हणूनी हसूदे वा चिडवूदे कोणी
ती वेळच होती वेडी अन् नितांत लोभसवाणी

ती उन्हे रेशमी होती, चांदणे धगीचे होते
कवितेच्या शेतामधले ते दिवस सुगीचे होते
संकेतस्थळांचे सूर त्या लालस ओठी होते
ती वेळ पूरीया होती, अन् झाड मारवा होते

आरोहा बिलगायाचा तो धीट खुळा अवरोह
भरभरून यायचे तेंव्हा त्या दृष्ट नयनींचे डोह
डोहात तळाशी खोल वर्तमान विरघळलेले
अन् शब्दांच्या गाली पाणी थोडेसे ओघळलेले

ती हार असो वा जीत, मज कुठले अप्रूप नाही
त्या गंधित गोष्टीमधला क्षण कुठला विद्रूप नाही
ती लालकेशरी संध्या निघताना अडखळलेली
ती निघून जातानाही, बघ ओंजळ भरूनी ओली

मेकांच्या वाट्याला आलेले असतात, ते मात्र मनामध्ये अमर होऊन रहातात. आणि या क्षणांकडे बघून जे म्हणावसं वाटतं, ती

ही कविता -

...

....

...

...

...

?... ! ... ;

!!

## Priye Ye Nighoni

Album: Sang Sakhya Re...
Song: Priye Ye Nighoni
Singer: Salil Kulkarani,
Poetry: Sandip Khare.

Priye ye nighoni ghnanchya kadene
mala ekatese ata vatatahe
kunalaach je sangta yet nahi
ase kahise manmani datatahe...

ase vatate ki tuzya paas yave
tuzya saumya netratale neer whave
parantu mala vel bandhun nete
kadhi muktataa he kunala na thave !

saye paay dagadi ni dagadich matha
asha devalatun jaun yeto
na dei kadhi ghetalyavin tyala
namaskar nemast deun yeto!

ase vatate ki kadhi koni navhato,
na aahe, na vahe uratuni shwas...
urantaratuni yaitrikatene
fire fakta vaara... ki nava to hi bhas !!

dise je kavila, na disate ravila!
sangun gele kunise shahane!
mala tu na disashi parantu tayanchya-
- nashibi kase sang tujala pahane?

ase vaatene..hi ashi sanj tyat
durava swatashi...tuzyashi durava!
kiti fatato jeev saglyat yaat
mithitun dein sagala purava!!

## Paus Asa Runjhunata

Album: Sang Sakhya Re...
Song: Paus Asa Runjhunata
Singer: Salil Kulkarani,
Poetry: Sandip Khare.

Paus asa runjhunta
painjane sakhichi smarali
Paus bhijat jatana
chahul virat geleli...

Oletyane darawalale
aswasth phulaanche ghos
Olandun aala gandh
nistabdh manaachi ves

[Sandip]
Paus sohala jhala
kosaltya aathavanincha...
kadhi udhaantaa an kevha
kosalatya aathavanincha !

Nabh 'nako nako' mhantana
paus kashane aala?
gaatrantun swachhandi an
antarat ghusamatalelaa...

## Tujhe ni majhe

Album: Sang Sakhya Re...
Song: Tujhe ni majhe
Singer: Salil Kulkarani,
Poetry: Sandip Khare.

Tujhe ni majhe naate kay?...
tu denari mi... mi ghenara
tu ghenari... mi denara
kadhi na kalate rup badalate
chakrache aavartan ghadate
aapulyamadhale pharak konate?
an aapulyatun samaan kay?....

mala khatri aahe tilahi zop aali nasel...
sundar swapne padat asatil,
pan kushivar valel... usaasel...
mala khatri aahe tilahi zop aali nasel
tichyasamori tech dhag.. je mazyasamor!
tichyasamori tech dhuka.. je mazyasamor!
tiche maze swalpaviramhi sarakhe an purnaviramhi!
mhanuna tar mi asa aakanth jagaa asatana
tichihi paapni purna mitali nasel...
mala khatri aahe tilahi zop aali nasel...

sukhadukhachi hoti vrushti
kadhi hasalo, kadhi zalo kashti
sayaasavin sahajachi ghadate
sames yeto tali padate!
kuthalya janmanchi lay julate?
ya matranche ganit kay?
tuze ni maze nate kay ?...

bagiche lavale aahet aamhi ekatra... ekaki
mati kalavali aahe aamhi char hatani
nakhat mati aahe aamha doghanchya...ajunahi
manat phula aahet aamha doghanchya... ajunahi
doghanchyahi hatavar ekmekanchya reshya aahet !
doghanchyahi hatavar ekmekanchya bhasha aahet !
ratri houn jaeel chandra chandra aani mi jagach asen;
tevha bedchya astarakhali vahat rahavi nadi
tashi ti hi jagich asel...
mala khatri aahe tilahi zop aali nasel...

natyala ya nakoch naav
doghanchahi yekach gaav!
vegvegale pravas tarihi

samaan doghanmadhale kahi !
thech lagate ekala
ka raktale dusaryacha pay?
tuze ni maze nate kay ?...

## Ajun Ujadat

Album: Sang Sakhya Re...
Song: Ajun Ujadat
Singer: Salil Kulkarani,
Poetry: Sandip Khare.

Ajun ujadat nahi ga !
ajun ujadat nahi ga !

dashkamaguna sarali dashake
an shatakachya gatha ga !
na vatancha moha sute va
na mohachya vaata ga!
path chakvyacha, gol,
saral va kunas umagat nahi ga
pravas kasala? farfat avaghi !
paan julatun vahi ga...

kadhi vatate 'divas' 'raatra' he
nasate kahi asale ga
tyanchyalekhi raatra sadachi
jyanche dole mitale ga
sparsh aandhale.. ghandh aandhale bhavtali vanrai ga
tamatali buser shantata... kani kujan nahi ga...

yekach palabhar yekhadi kal
ashi sananue jate ga
shanat virati avaghe padade
lakhha kahi chamchamte ga !
ti kal sarate... hurhur urate an piknyachi ghai ga
varvar saare shimpan kahi aatun umalat nahi ga !!!

## Sang Sakhya re

Album: Sang Sakhya Re...
Song: Sang Sakhya re
Singer: Salil Kulkarani,
Poetry: Sandip Khare.

Sang sakhya re aahe ka ti ajun taishich gard raeepari?

Sang sakhya re ajun ka dolyatun tichiya jhulate ambar?
Sang ajunhi nije bhovati tichya ratraniche asatar?
sang ajunahi taishich ka ti asmaanichya nilaeepari?

Phule sparshata yete ka re ajun botanmadhuni tharthar?
tichya swarani hote ka re sanja aveli ajun katar?
ajunahi ti ghumate ka re velumadhlya dhund shilepari?

[Sandip]
Paus sohala jhala
kosaltya aathavanincha...
kadhi udhaantaa an kevhaa
kosalatya aathavanincha !

Nabh 'nako nako' mhantana
paus kashane aala?
gaatrantun swachhandi an
antarat ghusamatalelaa...

## Vyarth he sarech

Album: Sang Sakhya Re...
Song:Vyarth he sarech
Singer: Salil Kulkarani,
Poetry: Sandip Khare.

Vyarth he sarech taho ek he dhyanat raho
muth poladi jayanchi hi dhara dasi tayanchi !

paij je gheti nabhashi aani dhadaka dongarashi
rakt jyaiche tapta aahe fakt tyanna hakka aahe
swas yethe ghyavayacha aag paanya lavnyacha-
-urafadya chhand aahe mrutu jyanna vaidya aahe

sajirya jakhama bhujaishi aani aakanksha urashi
ghyav jyancha bhav aahe loha jyaina dev aahe
mati ho vibhuti jayanchi hi dhara dashi tayanchi !!

shabd molache tayanche nrutya keval tandavache
sur nidra bhankshanyala chhinni bhakit koranyala
je n keval baralati god gani koradi !
je n keval kharalati chandrataryanchi stuti !
zep jyanni ghaluni ambaranna soluni
tarka churgalalelya mangatala bandhalya
grah jayanchi torane surya jyanche khelane
antarale malati sagare dhundalati
vanhila je polati roj lanka jalati
hi ashi sheput jayanchi hi dhara dasi tayanchi !!

hastaki gheun kathi keshri ghalun chhati
ram olya tapta othi rakh ripuchi an lalati
das yesa maj disu de romromatun vasu de
saukhyanibabrshya tvcheshi vedana hi thasthasu de !
them tya tejamrutacha maj ashaktala milu de !
kanchanatun buddh jinya paris poladi milu de !
je swatasathich vahe rakta te sare galu de !
rakta sare lal anti peshi peshina kalude !
ashru aani gham jyanni misaluni raktamadhoni
lakh pele phast kele an swatala masta kele;
tya bahakalya mansanchi tya kalandar bhangdachi
hi nasha aakash hote sarjanachi kosh hote!
hi ashi vesane jayanchi hi dhara dasi tayanchi !!

## Tarunai

Album: Sang Sakhya Re...
Song: Tarunai
Singer: Salil Kulkarani,
Poetry: Sandip Khare.

Hi tarunai...
aabhalachi neelai... sagarachi gaharai
harek kshanachya dolyatali roshanai...

kadhi vatanpudhati palate
kadhi jagachi girakya ghete
varaa hi... para hi ... hataat tharat nahi re nahi nahi...

hi thartharti vel
ha hurhurnyacha khel
aabhal sangate kanat hichya re kahi re kahibahi...

ya hrudayachya thokyane
hi zulavit jaee gane
rangate..sangate swapnanchya deshichi bedhund navalai...

megh houn kadhi hunkare
satar houn kadhi zankare
disate ashi ki ghatat sajali hiravai vanrai...

hi maifil ek suhani
hi madak an mastani
hi shahanyahunhi shahani
kadhi kambakhatanchi gani
'ye' mhanun yeina..'ja ja' mhanun
jat ti nahi nahi nahi...

## Maitrin

मैत्रिण

मैत्रिण माझी बिल्लोरी, बुट्टूक लाल चुट्टुक चेरी
मैत्रिण माझी हूं का चूं!, मैत्रिण माझी मी का तू !

मैत्रिण माझी हट्टी गं, उन्हाळ्याची सुट्टी गं,
मैत्रिण माझ्या ओठांवरची कट्टी आणि बट्टी गं !

मैत्रिण रुमझुमती पोर, मैत्रिण पुनवेची कोर
मैत्रिण माझी कानी डूल, मैत्रिण मैत्रिण वेणीत फूल!

मैत्रिण मांजा काचेचा, हिरवा हार पाचूचा
बदामाचे झाड मैत्रिण, बदामाचे गूढ मैत्रिण

मैत्रिण माझी अशी दिसते, जणू झाडावर कळी खुलते
ओल्या ओठी हिरमुसते, वेड्या डोळ्यांनी हसते

मैत्रिण माझी फुलगंधी , मैत्रिण ञाझी स्वच्छंदी
करते जवळीक अपरंपार, तरीही नेहमी स्पर्शापार

मैत्रिण सारे बोलावे, मैत्रिण कुशीत स्फुंदावे
जितकेधरले हात सहज , तितकेअलगद सोडावे

मैत्रिण माझी शब्दांआड लपते, हासुनिया म्हणते,
पाण्याला का चव असते, अन् मैत्रिणीस का वय असते

मैत्रिण, थोडे बोलू थांब, बघ प्रश्नांची लागे रांग
दुःख असे का मज मिळते, तुझ्याचपाशी जे खुलते

मैत्रिण माझी स्वच्छ दुपार, मैत्रिण माझी संध्याकाळ
माझ्या अबोल तहानेसाठी मैत्रिण भरलेले आभाळ

सफरचंद

सफरचंदान न` ा फक्तपडायचेअसते
करायची नसते काळजी फांदीवरचे इतर सोबती पिकल्याची-ना पिकल्याची
करायची नसते काळजी फांदीखालील बेसावध डोक्यांची
वेळ झाली कळताक्षणी सारा गर गोळा करून
फांदीवरच्या फलाटावरून झाडाचे गाव सोडायचे असते
सफरचंदान न` ा फक्तपडायचेअसते

मग ते पाहून कुणाला गुरुत्त्वाकर्षणाचा नियम सुचू देत -ना सुचू दे
सुचल्याच्या आनंदात तेच सफरचंद कापून खाऊ देत-न खाऊ दे
पडणाऱ्याचे नशीब वेगळे सुचणाऱ्याचे नशीब वेगळे
सुचणाऱ्यागत पडणाऱ्यान `नोबेलबिबेल मागायचे नसते
सफरचंदान न` ा फक्तपडायचेअसते

विचार नसतो करायचा की स्थितीज ऊर्जेची गतीज ऊर्जा कशी होते
नसते चिंतायचे की मरणासारखे त्वरण सुद्धा अंगभूत असते
नियम माहित असोत-नसोत नियमानुसारच सारे घडायचे असते
जर सफरचंद असेल तर त्यान ट` पकायचेअसते
जर पृथ्वी असेत ते तिन ओं` ढायचेअसते
सफरचंदान न` ा फक्तपडायचेअसते

सफरचंदालाही असतीलच की स्वप्ने, की कुणीतरी हळूवार झेलावे
किंवा उगवावे थेट चंद्रावर, आणि मग पिसासारखे अलगद पडावे
पण एकेक असे पिकले स्वप्न वेळीच देठाशी खुरडायचे असते
अन् चिख्खल असो वा माती असो, दिवस असो वा रात्र असो, फळ असो वा दगड असो
एकाच वेगात मधले अंतर तोडायचे असते
सफरचंदान न` ा फक्तपडायचेअसते

## ?

[ आयुष्यावर बोलू काही च्या उत्तरार्धाची सुरुवात अनेकदा या कवितेने होते. ]

एवढंच ना? एकटे जगू.. एवढंच ना?

आमचं हसं, आमचं रडं, घेऊन समोर एकटेच बघू,
एवढंच ना?

रात्रीला कोण? दुपारला कोण? जन्माला अवघ्या या पुरलंय कोण?
श्वासाला श्वास, क्षणाला क्षण, दिवसाला दिवस जोडत जगू!
एवढंच ना?

अंगणाला कुंपण होतंच कधी, घराला अंगण होतच कधी,
घराचे भास , अंगणाचे भास, कुंपणाचे भासच भोगत जगू,
एवढंच ना?

आलात तर आलात, तुमचेच पाय, गेलात तर गेलात कुणाला काय ?
स्वतःचं पाय, स्वतःचं वाट, स्वतःचं सोबत होऊन जगू
एवढंच ना?

मातीचं घर, मातीचं दार, मातीच घर, मातीच दार
मातीचं घर, मातीचं दार, मातीच्या देहाला मातीचे वार
मातीचं खरी, मातीचं बरी, मातीत माती मिसळत जगू
एवढंच ना?

जसं की...कांदा
कांद्याच्या आत वाटी...
वाटीच्या आत वाटी...
वाटीत वाटी...वाटीत वाटी...
कांदाणू...
परमकांदाणू...
आणखी आत...आत आऽत...
अगदी आऽऽत?...
माहित नाही......

जसं की...कांदा
त्याच्यावर हवा...
त्याच्याभोवती हवा...
हवेभोवती हवा...
तिचे थरांवर थर...
मग...निर्वात...
अंधार...
अंतराळ...
अंतराळं...
बाहेर...
अगदी बाऽहेर...
अगदी बाऽऽहेरचं?
माहित नाही......

...ती पडल्या पडल्या डोळाभर बघते मला
आणि मग डोळे मिटून हातांनी 'चाचपत' राहते,
सद्ध्या तिच्या असलेल्या हातांनी'
सद्ध्या माझा असलेला चेहरा......
ही कविता खर त ˙ रभीतःभीत
कापर्या कापर्या हातांनी
तिलाच लिहायची होती एकदा...
तिचं धैर्य होत नाही...माझ ंहोतं...एवढंच !

------------------------------------ संदीप .

... ...

...ती म्हटली - ’ते आलेच ओघाओघाने...’
मी म्हटले - "तू कधी येणार ?-
- ओघाओघान ज ` ाऊदे
निदान एखादी बारीकशी धार ?"

...ती म्हटली - ’तुला काय ? आता खुश्शाल
झोपशील...’
मी म्हटले - " आमेन ! -
- अजून बरीच रात्र आहे शिलकीत...
मेणासारखा चटके खात
मेणबत्तीभोवतीच जमेन !!"

...ती म्हटली - ’कळतच नाही काय बोलतोस...
मी जातेच कशी !’
मी म्हटले - "ते आलेच ओघाओघाने...
आता रात्रीच्या मिठीत मी
आणि माझ्या मिठीत उशी !!".......

----------------------------------------------- संदीप

"तुझ्याकडे तर दिसत नाही एखादीही डिग्री..."
पारावरच्या डोंगळ्याला मी विचारले -
"...आणि तरीही चांगला गलेलठ्ठ जगतो आहेस..."

तो थबकला
कसनुसं म्हणाला -
"छे ! आमचं कसलं आलंय...डोंगळ्याचं जीणं !"

"नाहीतरी काय एवढा फरक आहे ?"
मी म्हणालो...
आणि डोंगळ्यासारखा तुरूतुरू पुढे निघालो......

------------------------------------संदीप

## Bumbumba

आम्ही राहतो लांब तेथल्या वस्तीहून
पडका वाडा बसला आहे दबा धरून
त्या वाड्याच्या परसामध्ये एक विहीर
दिवसा दिसते साधी भोळी अन् गंभीर
परंतु तेथे जावयास ना कोणा धीर
कारण आहे पक्के ठाऊक आम्हाला
त्या विहिरीतून रहात असतो....बुंबुंबा

ह्रीं ह्रां ह्रीं फट् ॐ फट् स्वाहा
कुजबुजते हिरवे हिरवे जहरी पाणी
उच्चारावे मंत्र अघोरी जसे कुणी
दूर डोंगरामागून तुडवत उघडा माळ
काठावरती येऊन बसते संध्याकाळ
पाण्यावरती पडता छाया सांजेची
दिवसावर हो काळी जादू रात्रीची
घुमघुमणारे गोड पारवे दिवसा जे
विरून जाती रूप धारती घुबडांचे
घुबडांच्या डोळ्यातून मग जळती दिवट्या
तरंगणाऱ्या माडांच्या होती कवट्या
भीतीचा ऊर फाटे असल्या वक्ताला
आळस देतो जागा होऊन.....बुंबुंबा

हिरवे डोळे बुबुळ पांढरे फिरे हिडीस
नाकाजागी केवळ भोके अठ्ठावीस
उडता येते परी आवडे सरपटणे
गाळ चोपडे अंगाला जैसे उटणे
उठल्या उठल्या पहिली त्याला लागे भूक
पिऊन घेतो शेवाळ्याचे हिरवे सूप
अन्य न काही चाले या बुंबुंबाला
भूतेच खातो ताजी ताजी नाश्त्याला
जे जे दिसते त्याची चटणी जोडीला
खा खा खातो पी पी पितो...बुंबुंबा

खोडी काढी खोटे जर बोले कोणी
आणेल कोणी आईच्या डोळा पाणी
चोरी चहाडी दंगा ही जर करी कुणी
बुंबुंबा घेतो बोलावून त्या क्षणी
जवळ घेऊनी कौतुक करतो आणि असे
त्यानंतर तो माणूस कोणाला न दिसे
बुंबुंबाचा डेरा नकळे केंव्हाचा
खापरखापरपणजोबांहून पूर्वीचा
त्यास न भितो असा जगातून कोण भला
बुंबुंबाही घाबरतो बुंबुंबाला
करण्याआधी वाईट काही रे थांबा
दिसेल अथवा आरशातूनी ...बुंबुंबा

...

खूप बोललो आता एवढंच सांग
डोळ्यांतून लागतो का मनाचा थांग ?
आठव ना पक्ष्यांचे रंगीत थवे...
मी म्हटलं - 'चंचल असतात !'
तू म्हटलंस - "आपल्याला हवेत !!"
मग छाती फुटून धावलो ...धावावंच लागतं...
हातातून हात सुटून जातात, दु:ख त्याचं असतं...

कसले गं सूर ? कसले शब्द ? सारंच थोटं...
जगण्याला नसतंच धड, असलंच तर ते थोटं !
हात आहेत, पण ते हलत नाहीत
त्यांना फुलं टोचतात , काटे सलत नाहीत !
हा तुझा अणुकुचीदार 'का ?' ठेवशील का बाजूला ?
भिंत बांधली गेली एवढंच खरं, एकेक वीट उपसा कशाला ?

तीन भिंती झाल्या होत्या बांधून
तेवढ्यात तू आलीस...
आणि अशी आत-बाहेर नाचते आहेस आता चिमणीसारखी
की चौथी भिंत बांधताही येत नाही......

मी ही धावायचो वार्यावर, उभा असायचो माळरानावर
मी ही पळायचो पक्ष्यांपाठी...माझ्याही घराला नव्हत्या भिंती...
असो ! आता स्पष्टीकरणे नकोत जास्त
माझीच माझ्यावर चालू आहे गस्त !

चौथ्या भिंतीचे बांधकाम चालू आहे
अजून बांधून झाली नाही...
आत का बाहेर ते एकदाच ठरव
नंतर आतलं बाहेर नाही आणि बाहेरचं आत नाही......

अगंSS भिंत असली तरी आकाश दिसतं;
आणि नीट बघीतलं तर आकाशात देव !
जगायला एवढं...अगदी एवढंच लागतं...

-------------------------------------------------------- संदीप .

...

"अक्षर छान आलंय यात !"
माझी कविता वाचताना
मान तिरकी करत
ती एवढंच म्हणते...

डोळ्यांत तुडुंब भरलेली झोप,
कपाळावर पेंगत बसलेले काही भुरटे केस ,
निसटून गेलेली एक चुकार जांभई,
आणि नंतर...
वाचता वाचता मध्येच
आपसूक मिटलेले तुझे डोळे,
कलंडलेली मान,
आणि हातातून अशीच कधीतरी निसटलेली,
जमिनीवर पडलेली
माझी कवितांची वही...

हरकर नाही, हरकत नाही;
कविता म्हणजे तरी आणखी काय असतं !!

---------------------------------------------- संदीप

-1

हा समुद्र...
हजार लाटांनी समजावतो आहे या तटाला
तरीही त्याचे 'जमिनपण'
प्रत्येक लाटेला ओसरवताना
रंगीतच होते आहे अधिकाधिक......!

-2

बदलते,मावळते रंग
गोंदवून घेण्याचा
मनस्वी छंद या वाळूला
खूप जुना !

-3

त्या मावळत्या तांबड्या टिकलीला
हे कपाळ रोजचेच...
युगानुयुगांचे अभंग पातिव्रत्य !

-4

दूरवर विरघळते आहे
आणखी एक संध्याकाळ
समुद्राच्या पाण्यात...
...तू कुठे आहेस , प्रिय ?
बघ, हे जीवघेणे विरघळणे ......

-5

खूप वरचे स्वर लागताहेत आज
अचूक आणि भिजलेले...
त्यात हा समुद्राचा अखंड खर्ज...
असेच गाणे येईल ?

-6

जायची वेळ ! वारा सुटलाय...
माझी परतती पावलंही
त्रयस्थपणे पुसतो आहे हा समुद्र !
दुसर्याला रडवणारी
कसली ही स्थितप्रद्न्यता......प्रिय ?

-7

मी नसेन
तेव्हाचा समुद्र पाहायचा आहे......

-8

मी नसताना
खडकांच्या गळ्यात हात टाकून

उदास ह्सत असेल हा...
...असेल ना, प्रिय ?.......

-9

येतो...सार्यांनो...येतो...

-10

...हुरहुर...
...लाटेगणिक...
...लाटाभर...

---------------------------------------------- संदीप .

## ? (                    )

तू आवडतोस/तेस
तू खूप आवडतोस/तेस
तू प्रचंड आवडतोस/तेस
तू सॉलीड आवडतोस/तेस
तू अफाट आवडतोस/तेस
तुझ्यावाचून जगणे नाही इतका/की आवडतोस/तेस
श्वास घेणं शक्य नाही इतका/की आवडतोस/तेस
तू नसशील तर नसेन मी ही इतका/की आवडतोस/तेस

तो/ती खपून आता वर्ष होईल अवघ ंदीड
पण अजूनही आवडतंच त्याला/तिला
वाडीलालचं चॉकलेट आईस्क्रीम,
ब्राऊन शेडेड शर्ट/साड्या,
सनसेट, भीमसेन, पिकासो, परफ्युम्स...
आणिक हो !
आताशा ऑफिस सुटल्यानंतर
त्याच्या/तिच्या ऑफिस सुटल्यानंतर
त्याच्या/तिच्या ऑफिस कलीगची कंपनीही
एक कप कॉफीसाठी (?)...
'तो'/'ती' असली म्हणजे मन थोड ह ˙ लळंहोतंनोऽऽ

'तो'/'ती' आवडतो/ते
'तो'/'ती' खूप आवडतो/ते
'तो'/'ती' चिकार आवडतो/ते
...तुझ्यावाचून जगणे नाही...
...श्वास घेणं शक्य नाही...
...तू नसशील तर नसेन मी ही...
................वगैरे.....

------------------------------------ संदीप .

,

रात्र सुंदर, चंद्र सुंदर
रात्र काळी होत शाई, मन्मनाच्या कागदांवर

हे निघाले तारकांचे संथ तांडे डोंगराशी
रात्र थकल्या काफिल्यापरी उतरणीवर चहूदिशांशी
हे निघाले दव धुळीचे लोट अन् आले धरेवर
रात्र सुंदर, चंद्र सुंदर

शांतता ही काय वर्णू, तव मिठीसम आर्त सुंदर
चांदण्यान ब ह क ल ल्यारात्रीचेयाहरगात्रसुंदर
या तुझ्या अनिवार सईचे जीवघेणे सत्र सुंदर
रात्र सुंदर, चंद्र सुंदर

रात्र ओला शब्द मागे, या जिण्याचा अर्थ मागे
निरवतीच्या अक्षरांवर एक हळवी रेघ उमटे
रात्र वेडी, चंद्र वेडा, वेड माझे येई भरावर
रात्र सुंदर, चंद्र सुंदर

बारीश से अक्सर मिला करता था मैं
बारीश से अक्सर मिला करता था मैं

और तुमसे भी कभी कबार...

इत्तेफाकन् मगर तीनों इकट्ठा कभी नही मिले हैं हम
इत्तेफाकन् मगर तीनों इकट्ठा कभी नही मिले हैं हम

मिन्नते तो बहुत की थी मैने
बारीश से भी, तुमसे भी... मगर खैर...

अब की बार थान ली है मैने
तुम दोनों को साथ साथ ही मिलन`की
अब की बार थान ली है मैने
तुम दोनों को साथ साथ ही मिलन`की

इसिलिये अब आँखोमेंही बारीश लिये घूमता हूँ मैं...
उन्ही गलियों में...
जहाँ इत्तेफाकन् कभी तुम मिल जाओ शायद...
मिल जाओ शायद...

...

तुझ्या माझ्यासवे कधी गायचा पाऊसही
तुला बोलावता पोचायचा पाऊसही

पडे ना पापणी पाहून ओलेती तुला
कसा होता नि नव्हता व्हायचा पाऊसही

तुला मी थांब म्हणताना तुला अडवायला
कसा वेळीच तेव्हा यायचा पाऊसही

मला पाहून ओला विरघळे रुसवा तुझा
कशा युक्त्या मला सुचवायचा पाऊसही

कशी भर पावसात आग माझी व्हायची
तुला जेव्हा असा बिलगायचा पाऊसही

आता शब्दांवरी या फक्त उरलेल्या खुणा
कधी स्मरणे अशी ठेवायचा पाऊस ही

# (Ved Laagla..)

दिसलीस वाऱ्यामध्ये आपुल्याच तोऱ्यामध्ये
निळेभोर नभ तुझ्या काळ्याभोर डोळ्यामध्ये
वेड लागलं...
वेड लागलं मला वेड लागलं मला वेड लागलं

काळ्याभोर डोळियांनी दावियला इंगा
आता रण रण माळावर घालतो मी पिंगा
चंद्राळली लाट वर गगनाला भिडे
रोज राती दारातून कवितांचे सडे माझ्या वेड लागलं...
वेड लागलं मला वेड लागलं मला वेड लागलं
वेड लागलं आता वेड लागलं आता वेड लागलं

हिरव्याशा पदराचे हलताना पान
कोण नभ कोण धरा झाडा नाही भान
जशी काही पाखराला दिसे दूर वीज
तिला म्हणे येना माझ्या घरट्यात नीज आता वेड लागलं...
वेड लागलं मला वेड लागलं मला वेड लागलं
आता वेड लागलं, वेड लागलं, वेड लागलं

पुनवेची रात अशी येताना भरात
घालतो मी हाक आता रिकाम्या घरात
पाहतो मी बोलतो मी चालतो मी असा
वाऱ्यावर उमटतो अलगद ठसा आता वेड लागलं...
वेड लागलं मला वेड लागलं मला वेड लागलं
आता वेड लागलं मला वेड लागलं मला वेड लागलं

खुळावले घरदार खुळावला वंश
मीच केले जागोजाग देहावर दंश
उसळली अगं अशी झणाणली काया
जीव असा खुळा त्याला विषाचीच माया आता वेड लागलं...
वेड लागलं मला वेड लागलं मला वेड लागलं
आता वेड लागलं मला वेड लागलं मला वेड लागलं

मला ठाव व ॅ डतुझेविनाशाचीहाक
डोळ्यातून दिसू लागे वेडसर झाक
नका लागू नादी सारी उपराटी तऱ्हा
शहाण्याच्या समाधीला शेवटचा चिरा..हां वेड लागलं
वेड लागलं, हां वेड लागलं, वेड लागलं, आता वेड लागलं

या कवितेचा विशेष म्हणजे तीन कडवी तीन वेगवेगळ्या रसांमधली आहेत  (वीर रस, करूण रस व भक्ती र

सुपरमँन सुपरमँन सुपरमँन
वरतून चड्डी आतून पँट

अंगामध्ये ताकद फार, पोलादाची जणू पहार
पक्षी नाही तरी उडतो, मासा नाही तरी बुडतो
उडण्याचाही भलता वेग, पँरीस पनवेल सेकंद एक
रोज पृथ्वीला चकरा पाच, गेला म्हणता हा आलाच
गरुडाहूनही थेट नजर, जिथे संकटे तिथे हजर
कोसळती बस हा अडवी, फुंकरीत वणवा विझवी
अंतराळीचे व्हिलन कुणी , त्यांच्याशी दण्णादण्णी
अवघी दुनिया त्याची फँऽऽऽऽऽऽन
सुपरमँन सुपरमँन सुपरमँन

जरी जगाहून भिन्न असे, तरी मनातून खिन्न असे
आदर करती सर्व जरी परी न कोणी मित्र तरी
लांबून कौतुक हे नुसते, कुणी न मजला हे पुसते
जेवण झाले काय तुझे, काय गड्या हे हाल तुझे
दिवस रात्र हे तू दमशी, सांग तरी मग कधी निजशी
उडता उडता असे सुसाट, दुखते का रे मधेच पाठ
एकएकटे फिरताना, विचार करतो उडताना
आत रिकामे का वाटे, कसे वाटते सर्व थिटे
अंगी ताकद जरी अफाट, काय नेमके सलते आत
करुन बसला तोंड लहाऽऽऽऽऽन
सुपरमँन सुपरमँन सुपरमँन

असा एकदा एक दिशी उंच हिमाच्या शिखराशी
बसला असता लावून ध्यान त्यास भेटला मग हनुमान
काय तयाचे रूप दिसे सुर्याचे प्रतिबिंब जसे
शक्ती ही अन् युक्ती ही, तरी अंतरी भक्ती ही
आणि बोलले मग हनुमान....
ऐक ऐक हे सुपरमँन, ऐक ऐक हे सुपरमँन
ऐक ऐक हे सुपरमँन, ऐक ऐक हे सुपरमँन
रोनी सी ये सूरत क्यूँ? मित्रा I am proud of you!!
सर्वाहून आगळाच तू, जैसा मी रे तैसा तू
ऐक एवढे ते अवधान, शक्ती युक्ती चे हे वरदान
त्या रामान ि `द ,लेतुम्हा ब ` नवलेतुलामला
त्या रामास्तव करणे काम, त्या रामास्तव गळू दे घाम
साथ जरी ना कुणी असे , आत तुझ्या पण राम असे
राम राम हे म्हणत रहा, आणि जगाला भिडत रहा
त्या रामाचे करूनी ध्यान, चिरंजीव भव सुपरमँऽऽऽऽऽऽन
चिरंजीव भव ...सुपरमँऽऽऽऽऽऽन
सुपरमँन सुपरमँन सुपरमँन, जय हनुमान
सुपरमँन सुपरमँन सुपरमँन, जय हनुमान

स)

## ! !

कसा चंद्र! कसं वय !
कशी तुझी चांदण सय !
कसा निघेल इथुन पाय ?
वेड लागेल नाहीतर काय !

अंगामध्ये भिनत्येय वीज !
नाही जाग,नाही नीज !
दंव पडतंय शब्दांवर,
धुकं येतंय अर्थावर !
कसा निघेल इथुन पाय ?
वेड लागेल नाहीतर काय !

उभा आहे मस्त खुशाल !
अंगावर थंडीची शाल !
गुलाब तिच्या गालांवर,
काटा माझ्या अंगावर !
कसा निघेल इथुन पाय ?
वेड लागेल नाहीतर काय !

कशी मजा झाल्येय आज
शांततेची सुद्धा गाज !
फुटतंय सर ंआतल्याआत !
जंतरमंतर झाल्येय रात !!
कसा निघेल इथुन पाय?
वेड लागेल नाहीतर काय !

कशी झुळूक हलकीशी...!
कशी हवा सलगीची...!
कसा गंध वार्यावर !
राहील मन थार्यावर ?!
कसा निघेल इथुन पाय?
वेड लागेल नाहीतर काय !

रात्र बोलत्येय तार्याशी;
पहाट उभी दाराशी !
गूज आलंय ओठांशी
पण बोलाव त ं रीकोणाशी?
कसा निघेल इथुन पाय ?
वेड लागेल नाहीतर काय !

चंद्र असा झरझरतोय...
अबोलाही दरवळतोय...
मला आलाय अर्थ नवा;

तिला ऐकु जायला हवा !!
कसा निघेल इथुन पाय ?
वेड लागेल नाहीतर काय !

तुजवरी लावला जीव
हे मुळात चुकले माझे,
मी पाऊस हुडकायाला
ग्रिष्माच्या गावा शिरलो...........................

------------------------------------------------------------ संदीप .

...

स्वर टिपेचा आज वेचा ! रे उद्या, फुटणार काचा !
जायचे जातील ! पाहू सोहळा ; उरतील त्यांचा !

विस्मरुया आज सारे रंग ज्वाळेचा चीतेच्या.
चुंबनाचा रंग प्राशू लाजओल्या रक्तिम्याचा !

देहही नव्हता तपस्वी , जीवही नव्हता कलंदर...
झोपताना फक्त कुरवाळून घ्याव्या विद्ध टाचा ...

संगतीला दोन हिरवे हात घेऊन चाललो मी,
थाटण्या संसार ग्रिष्माच्या शिवेवर ; पावसाचा !!!

-------------------------------------------- संदीप .

...

आता पुन्हा पाऊस येणार....

आता पुन्हा पाऊस येणार , मग आकाष काळ नीळ होणार,
मग मातीला गंध फुटणार , मग मधेच वीज पडणार,
मग तूझी आठवण येणार, काय रे देवा.....

मग ती आठवण कुणाला दाखवता नाही येणार ,
मग मी ती लपवणार,मग लपवुनही ती कुणाला तरी कळावस वाटणार ,
मग ते कोणितरी ओळखणार,
मग मित्र असतील तर रडणार , नातेवाईक असतील तर चिडणार,
मग नसतच कळल तर बर, असं वाटणार...
आणि ह्या सगळ्याशी तुला काहीच देण घेण नसणार..
काय रे देवा.....

मग त्याच वेळी दूर रेडियो चालू असणार, मग त्यात एखाद जुन गाण लागलेल असणार्,
मग त्याला एस. डी. बर्मननी चाल दिलेली असणार्,मग साहिल ते नी लिहिलेल असणार्,
मग ते लतानी गायलेल असणार्...,
मग तूही नेमक आत्ता हेच गाण ऐकत असशील का? असा प्रश्न पडणार्,
मग उगाच छातीत काहीतरी हुरहुरणार, मग ना घेण ना देण पण फुकाचे कंदील लागणार् ....
काय रे देवा.....

मग खिडक्यांचे गज थंडगार होत जाणार्.., मग त्याला आकाशाची आसव ंलगडणार्..,
मग खिडकीत घट्ट बांधून ठेवलेल्या आपल्या पालथ्या मूठीवर ते टपटपणार्....,
मग पाच फूट पाच इंच देह अपूरा अपूरा वाटणार , मग ऊरी फुटुन जावसं वाटणार , छाताडातून ह्रुदय काढून
मग सार क ं स ं म ू खर्ासारखंउत्कटंउत्कटंहोतजाणार्
पण तरीही श्वासाची लय फक्त कमी जास्त होत राहाणार, पण बंद नाही पडणार्,
काय रे देवा.....

पाउस पडणार्.. मग हवा हिरवी होणार..मग पाना पानात हिरवा दाटणार्,
मग आपल्या मनाच पिवळ पान देठं मोडून हिरव्यात शीरू पहाणार, पण त्याला ते नाही जमणार्,
मग त्याला एकदम खर काय ते कळणार्, मग ते ओशाळणार्,
मग पून्हा शरीराशी परत येणार, सर्दी होउ नये म्हणून देहाला वाफ घ्यायला सांगणार, चहाच्या पाण्यासाठी फ्री
एस. डी. चं गाणही तोपर्यंत संपलेलं असणार्,रेडियोचा स्लॉट भरलेला असणार्,
मग तीच्या जागी ती असणार, माझ्या जागी मी असणार्, कपातल वादळं गवती चहाच्या चवीन प `
काय रे देवा.....

पाउस गेल्यावर्शी पडला,पाउस यंदाही पडतो.. पाउस पूढच्या वर्शीही पडणार्....
काय रे देवा.....

ा त्या शूभ्र धारेखाली धरावासा वाटणार् ...,

ाजमध्ये कुडमुडलेलं आलं शोधंणार् ,

ो टातनिपच्चीत्नझालेलंअसण

आज मी आयुष्य माझे चाचपाया लागलो
नेमकेते हरवले जे मी जपाया लागलो ...

शोधले माझेच पत्ते आत मी माझ्या किती
जग हरवलो तेव्हाच कोठे सापडाया लागलो...

ठरवले हे पाहीजे, ते पाहीजे , ते ही हवे
मागण्या ताज्या तवान्या मी थकाया लागलो...

मी सुखाला पाळले बांधून दारी माझीया
ते सुखान झ ` ो प लेमीगस्त्तद्यायाजागलो

गीत माझ्या लेखणीचे इतुके भिनले तिला
ती लिहाया बैसली अन मी सुचाया लागलो...

मज न आता थोडकी आशा कुणी की म्हणा
आज मी माझ्याच साठी गुणगुणाया लागलो...

काय हे आयुष्य माझे , काय हे जगणे तरी
मला सोडून मी सर्वा आवडाया लागलो...

गीत माझ्या लेखणीचे एवढे भिनले तिला ;
ती लिहाया बैसली अन् मी सुचाया लागलो !

शोधले माझेच पत्ते आत मी माझ्या किती...
हरवलो तेव्हाच कोठे सापडाया लागलो !

मज न आता थोडकी आशा कुणी की "वा" म्हणा !
आज मी माझ्याचसाठी गुणगुणाया लागलो !

काय हे आयुष्य माझे, काय हे जगणे तरी,
मी मला सोडून सर्वां आवडाया लागलो...

तकी नाजुक इतकी आल्लाड फुल्पखाराहून अलवार
चालू बघता नकळत होते वरवर्ती अलगद स्वार इतकी नाजुक ....... १
भिजल्या देही गवाक्षतुनी चन्द्र किरण ते पड़ता चार
लक्खा गोरटी रापून जाली रात्रीत एका सवाल नार २
इतकी नाजुक जरा निफेनी जोर दूनी लिहिता नाव
गलित अली दुसर्या दिवशी अंगा अंगावर हलवे घाव इतकी नाजुक.......................३
कश्या क्रूर देवान ि द धल्यानाजुक्तेच्याकलातिला
जरा जलादसा श्वास धावता त्यांच्या देखिल ज़ला तुला ............४
इतकी नाजुक इतकी सुन्दर दर्पण देखिल खुलावातो
टी गेल्यावारती तो क्षण भर प्रतिबिम्बाला धरु बघतो इतकी नाजुक .........५
इतकी नाजुक की जेव्हा टी पावसात जाऊ बघते
भीती वाटते कारन जलात साखर क्षणात विरघलते..............६
इतकी नाजुक की अत तर स्मर्नाचे भय वाटे
नको रुताया फुलास आपुल्या माज्या जगान्यतिल काटे .........7

## ?...

तु देणारी मी... मी घेणारा
तु घेणारी... मी देणारा
कधी न कळते रुप बदलते
चकाचे आवर्तन घडते
आपुल्यामधले फरक कोणते?
अन आपुल्यातुन समान काय?....
तुझे नी माझे नाते काय?...

सुखदु:खाची होता वृ्ष्टी
कधी हसलो, कधी झालो कष्टी
सायासाविन सहजची घडते
समेस येत टाळी पडते!
कुठल्या जन्माची लय जुळते ?
य मात्रान्चे गणित काय?
तुझे नी माझे नाते काय?...

नात्याला या नकोच नाव
दोघान्चही एकच गाव!
वेगवेगळे प्रवास तरीही
समान दोघान्मधले काही !
ठेच लागते एकाला
का रक्ताळे दुसयाचा पाय?
तुझे नी माझे नाते काय?...

## kadhitari vedyagat vagayla have

kadhitari vedyagat vagayla have!
ugachach ratbhar jagayala have!
sukhasin jagnyachi zali jallmate
jagnech saare pure zadayla have!.... kadhitari vedyagat vagayla have

Garthyat fekuniya shaal, kantopi
kadhitari thandilach vajayla have!
chote mothe dive funkarine malavun
kadhitari suryavar jalayala have!.... kadhitari vedyagat vagayla have!

khotya khotya shrungarachi lali rangavun
kashasathi sajayche chapun chopun?
varyavar udavat padar jeenyacha
gaane gulchabu kadhi mhanayala have! .... kadhitari vedyagat vagayl

bhandyavar bhande kadhi bhidayla have
ugachach sakhivar chidayla have
mukhatun tichyavar pakhadat aag
ekikade premgeet lihayla have!.... kadhitari vedyagat vagayala have!

vilipari kadhi ek chandrakor ghyavi
hirvishi swapne dhare dharene chiravi
kor kor chandra chandra harta harta
manatun purnbimb tagayala have!.... kadhitari vedyagat vagayala ha

manatalya makadashi haat milvun
aacharave kadhitari vichara vachun!
zadapaas zombuniya haati yeta phal
sahajpane tehi phekayala have!.... kadhitari vedyagat vagayala have!

kahid raati lavuniya nayananche dive
pustakala kahitari vachayala dyave!
shodhuniya pranatale dumadale paan
mag tyane aplyala chalayala have!.... kadhitari vedyagat vagayala ha

dhagalasa kot, chhadi, vijar todki
bhatakyachi chal daivasarakhi fengadi!
jaganyala yavi ashi vinodachi jaan
hastana papnyani bhijayala have!.... kadhitari vedyagat vagayla have

swatahala vikun kay gheshil vikat?
khari khari sukhe raja milti fukat!
hapapun bajarat magshil kiti?
swatahatach nave kahi shodhayala have!.... kadhitari vedyagat vagay

tech tech pani ani tich tich hawa!

aani tula badalahi kashasathi hava?
junech ajun aahe riyajavachun!
gillele adhi saare pachayala have!.... kadhitari vedyagat vagayala hav

nako baghu pathimage yeil kalun
kititari karayche gelele rahun!
nako karu traga asa udyachya darat
swatahalahi kadhi maaf karayala have!.... kadhitari vedyagat vagayal

by sandip khare

!

a have!

ve!

ve!

!

'ala have!

ve!

a have!

बंद तटांशी या लाटांशी कधी थाबती पाय
पश्चिम वा-यावरती मज हे ऐकू येते काय
जीव भाबडा जगावेगळा बोलू गेला काय
जन्म मातीचा स्वप्न नभाचे तोलू गेला काय
तुझ्या वीजेचे दान माझिया मातीला देना
ये ना ये ये ना ये ना ये ना ये ये ना

जरीही बघतो विसरून तुजला तरीही का ऐसे
नभास म्हणतो जमीन आणिक जमीन जळ भासे
कैफ तुझ्या स्मरणांचा कैसा अजून उतरेना
ये ना ये ये ना ये ना ये ना ये ये ना

खिन्न काजळी जरीही चमके आतून रुधिराशी
लखलख ओळी तुझीयावरच्या येती अधराशी
जन्म हारलो पणास याचे इमान उतरेना
ये ना ये ये ना ये ना ये ना ये ये ना

तुला ऐकू दे तुला स्पर्शू दे तुला पाहू दे ना
हिशोब पापा - पुण्याचे हे ज़रा राहू दे ना
क्षणापायी हा शाप युगांचा मला झेलू दे ना
ये ना ये ये ना ये ना ये ना ये ये ना
संदीप खरे

माणसांना गरज असते कोंबड्यांची...बक-यांची
वाघसिंहांना गरज असते हरणांची..सांबरांची
घुबडघारींना गरज असते उंदरांची..सशांची...
म्हणून आम्ही जन्मा आलो!

कुणालातरी वाटले वंशाला दिवा हवा ..
कुणाला तरी वाटले बहिणीला भाऊ हवा ..
कुणालातरी वाटले घरात पाळणा हवा ...
म्हणून आम्ही जन्मा आलो!

भूमीचा भार ५०-६० किलोंनी वाढवायचा होता..
भाजीवाल्याचा धंदा दरमहिना फुगवायचा होता ..
डॉक्टरच्या बिलाचा आकडा दरमहिना इमानान ि ` ड ..कवायचाहोता
म्हणून आम्ही जन्मा आलो!

आभाळाला कुणीतरी विचारायला हवं ..
सारं बघणा-याला "मी ही बघतोय" हे सुनवायला हवं..
तुझ्या सिस्टीमच्या बेसिकमध्येच घोळ आहे हे कुणीतरी
ठणकवायला हवं...
म्हणून आम्ही जन्मा आलो!

...

आता पुन्हा पाऊस येणार
आकाश काळ निळ होणार
मग मातीला गंध सुटणार
मग मध्येच वीज पडणार
मग तुझी आठवण येणार
काय रे देवा...

मग ती आठवण कुणाला दाखवता नाही येणार
मग मी ती लपविणार
मग लपवूनही ते कुणालातरी कळावस वाटणार
मग ते कुणीतरी ओळखणार
मग मित्र असतील तर रडणार
नातेवाईक असतील तर चिडणार
मग नसतच कळल तर बर अस वाटणार
आणि या सगळ्याशी तुला काहीच घेण देण नसणार..

मग त्याच वेळी नेमका दूर रेडिओ चालू असणार
मग त्यात एखाद जुन गाण लागलेल असणार
मग त्याला एस. डी . वर्मन नी चाल दिलेली असणार
मग ते साहीर नी गायलेल असणार
मग ते लतानी गायलेल असणार
मग तू ही नेमका आत्ता हेच गाण एकत असशील तर.. असा प्रश्न पडणार
मग उगाच छातीत काहीतरी हूर हूरणार
मग ना घेण ना देण
पण फूकाचे कंदील लागणार
काय रे देवा...

मग खिडक्यांचे गज थंडगार होऊन जाणार
मग त्याला आकाशाची आसव लगडणार
मग खिडकीत घट्ट बांधून ठेवलेल्या आपल्या पालथ्या मुठीवर ते टपटपणार
मग पाच फूट पाच इंच देह अपुरा अपुरा वाटणार
मग ऊर फुटून जावस वाटणार
छाताडातून ह्रदय काढून त्या शुभ्र धारांखाली धरावस वाटणार
मग सारच कस मुर्खासारख उत्कट उत्कट होत जाणार
पण तरीही श्वासांची लय फक्त कमी जास्त होत जाणार
बंद नाही पडणार
काय रे देवा...

पाऊस पडणार
मग हवा हिरवी होणार
मग पानापानात हिरवळ दाटणार
मग आपल्या मनाच पिवळ पान मोडून हिरव्यात शिरू पाहणार
पण त्याला ते नाही जमणार
मग त्याला एकदम खर काय ते कळणार
मग ते ओशाळणार

मग पुन्हा शरीराशी परत येणार
सरदी होऊ नये म्हणून देहाला वाफ घ्यायला सांगणार
चहाच्या पाण्यासाठी फ्रिजमध्ये कूडंमूडलेल आल शोधणार
एस . डी , च गाणही तोपर्यंत संपलेल असणार
रेडिओचा स्टॉक भरलेला असणार
मग तिच्या जागी ती असणार
मग माझ्या जागी मी असणार
कपातल वादळ गवती चहाच्या चवीन प` ो टातनिपचीतझलेलअसणार

पाऊस गेल्या वर्षी पडला
पाऊस यंदाही पडतो
पाऊस पुढल्या वर्षीही पडणार
काय रे देवा...

...संदीप खरे

उफराटे हिशोब माझे
कोणाला कळले होते
मन ओले होते माझे
अन् म्हणून जळले होते

मी वजा जमेतून होतो
अन् जमा वजेस्तव होतो
हे गणित समजले तेंव्हा
आयुष्य निवळले होते

नवनीत सुखाचे आले
शब्दांच्या पात्रांवरती
मी आईच्या हातांनी
बघ दुःख घुसळले होते

जगण्याच्या पानावरती
स्वप्नांशी जमल्या गप्पा
मग मुहूर्त मरणाचेही
कंटाळून टळले होते

दुसऱ्या दिवशी दुःखांचा
बघ वासही आला नाही
नयनांचे पेले माझ्या
रात्रीच विसळले होते

चिमुकल्या चोचीमध्ये आभाळाचे गाणे
मातीतल्या कणसाला मोतीयाचे दाणे
उगवत्या उन्हाला या सोनसळी अंग
पश्चिमेच्या कागदाला केशरीया रंग
देतंय कोण, देतंय कोण, देतंय कोण देतंय... देतंय कोण, देतंय कोण, देतंय कोण देतंय...
धुम तारारा धुम, धुम तारारा धुम, धुम तारारा धुम, तारा...

सूर्यासाठी उषा आणि चंद्रासाठी निशा
घरी परतण्यासाठी पाखरांना दिशा
मध खाते माशी तरी सोंडेमध्ये डंख
चिकटला कोळी त्याच्या पायाखाली डिंक
देतंय कोण, देतंय कोण, देतंय कोण देतंय... देतंय कोण, देतंय कोण, देतंय कोण देतंय...
धुम तारारा धुम, धुम तारारा धुम, धुम तारारा धुम, तारा...

नागोबाच्या फण्यावर दहाचा आकडा
खेकड्याच्या प्रवासाचा नकाशा वाकडा
करवंदाला चिक आणि आळूला या खाज
कुणी नाही बघे तरी लाजाळूला लाज
देतंय कोण, देतंय कोण, देतंय कोण देतंय... देतंय कोण, देतंय कोण, देतंय कोण देतंय...
धुम तारारा धुम, धुम तारारा धुम, धुम तारारा धुम, तारा...

मूठभर जीव अन् हातभर तान
कोकिळेला गुरू नाही तरी गाई गान
काजव्याच्या पोटातून जळे गार दिवा
पावसाच्या अगोदर ओली होते हवा
देतंय कोण, देतंय कोण, देतंय कोण देतंय... देतंय कोण, देतंय कोण, देतंय कोण देतंय...
धुम तारारा धुम, धुम तारारा धुम, धुम तारारा धुम, तारा...

भिजे माती आणि उरे अत्तर हवेत
छोट्या छोट्या बियांतून पिके सारे शेत
नाजूकशा गुलाबाच्या भवतीन`काटे
सरळशा खोडावर फुले दहा फाटे
देतंय कोण, देतंय कोण, देतंय कोण देतंय... देतंय कोण, देतंय कोण, देतंय कोण देतंय...
धुम तारारा धुम, धुम तारारा धुम, धुम तारारा धुम, तारा...

गीत: संदीप खरे.
संगीत: सलिल कुलकर्णी.
स्वर: श्रेया घोषाल.

धैर्य
जसं की...कांदा
कांद्याच्या आत वाटी...
वाटीच्या आत वाटी...
वाटीत वाटी...वाटीत वाटी...
कांदाणू...
परमकांदाणू...
आणखी आत...आत आऽत...
अगदी आऽऽत?...
माहित नाही......

जसं की...कांदा
त्याच्यावर हवा...
त्याच्याभोवती हवा...
हवेभोवती हवा...
तिचे थरांवर थर...
मग...निर्वात...
अंधार...
अंतराळ...
अंतराळं...
बाहेर...
अगदी बाऽहेर...
अगदी बाऽऽहेरचं?
माहित नाही......

...ती पडल्या पडल्या डोळाभर बघते मला
आणि मग डोळे मिटून हातांनी 'चाचपत' राहते,
सद्ध्या तिच्या असलेल्या हातांनी'
सद्ध्या माझा असलेला चेहरा......
ही कविता खर त ˙ रभीत:भीत
कापर्या कापर्या हातांनी
तिलाच लिहायची होती एकदा...
तिचं धैर्य होत नाही...माझ ंहोतं...एवढंच !

------------------------------------- संदीप .

प्रेमात म्हणे कुणी हुरहुरते कुणी मोहरते राणी
प्रेमात म्हणे कुणी अडखलते बघ धडपडते कोणी !

प्रेमात म्हणे मोह्नात बुडी, ना सुते घडी ओठांची
प्रेमात म्हणे शब्दास भूल, जगान्यास जुल कवितेची
प्रेमात म्हणे जो गड़बड़तो तो बडबडतो गाणी!!

प्रेमात म्हणे हातात हात, होतात घात जन्माचे
प्रेमात म्हणे मिटतात श्वास, फिटतात पाश मरणाचे
प्रेमात म्हणे आरम्भ गोड अन अन्तापास विराणी

मज ठाव नसे हे प्रेम कसे पण ऐक तुज्याविन आता
क्षण एक दूर जाताच पुर डोळ्यात दाटती माज्या!
जो बुडालेला तो तरलेला, तरला तो बुडला, राणी!!

पाऊस असा रुणझूणता
पैंजणे सखीची स्मरली
पाऊस भिजत जाताना
चाहूल विरत गेलेली ...

ओले त्यान द` र वळलेअस्वस्थफुलांचेघोस
ओलांडून आला गंध , निस्तब्ध मनाची वेस
पाऊस असा रुणझूणता
[ पाउस सोहला झाला , पाउस सोहला झाला कोसळत्या आठवणीचा
कधी उधाणता अन केव्हा संथ थेम्बंच्या संथ लयीचा ]
..
नभ नको नको म्हणताना
पाउस कशान`आला
गात्रातून स्वच्छंदी अन
अंतरात घुसमटलेला..
पाऊस असा रुणझूणता
पैंजणे सखीची स्मरली
पाऊस भिजत जाताना
चाहूल विरत गेलेली..

मैत्रिण

मैत्रिण माझी बिल्लोरी, बुट्टूक लाल चुटुक चेरी
मैत्रिण माझी हूं का चूं!, मैत्रिण माझी मी का तू !

मैत्रिण माझी हट्टी गं, उन्हाळ्याची सुट्टी गं,
मैत्रिण माझ्या ओठांवरची कट्टी आणि बट्टी गं !

मैत्रिण रुमझुमती पोर, मैत्रिण पुनवेची कोर
मैत्रिण माझी कानी डूल, मैत्रिण मैत्रिण वेणीत फूल!

मैत्रिण मांजा काचेचा, हिरवा हार पाचूचा
बदामाचे झाड मैत्रिण, बदामाचे गूढ मैत्रिण

मैत्रिण माझी अशी दिसते, जणू झाडावर कळी खुलते
ओल्या ओठी हिरमुसते, वेड्या डोळ्यांनी हसते

मैत्रिण माझी फुलगंधी , मैत्रिण ञाझी स्वच्छंदी
करते जवळीक अपरंपार, तरीही नेहमी स्पर्शापार

मैत्रिण सारे बोलावे, मैत्रिण कुशीत स्फुंदावे
जितकेधरले हात सहज , तितकेअलगद सोडावे

मैत्रिण माझी शब्दांआड लपते, हासुनिया म्हणते,
पाण्याला का चव असते, अन् मैत्रिणीस का वय असते

मैत्रिण, थोडे बोलू थांब, बघ प्रश्नांची लागे रांग
दुःख असे का मज मिळते, तुझ्याचपाशी जे खुलते

मैत्रिण माझी स्वच्छ दुपार, मैत्रिण माझी संध्याकाळ
माझ्या अबोल तहानेसाठी मैत्रिण भरलेले आभाळ

लव्हलेटर.......
लव्हलेटर लव्हलेटर म्हणजे लव्हलेटर असतं
सरळ जाऊन बोलण्यापेक्ष इझी आणि बेटर असतं
गोड गुलाबी थंडीतला गोड गुलाबी स्वेटर असतं
घुसळ घुसळ घुसळलेल्या मनामधलं बटर असतं

लव्हलेटर लव्हलेटर म्हणजे एक सॉँग असतं
ज्यातला कंटेंट राईट आणि ग्रामर नेहमीच रॉँग असतं
सुचत नाही तेव्हा तुमच्या हार्ट मधली पेन असतं
आणि जेव्हा सुचत त ॅ ८ हानेमकंखिशातपेननसतं
पटलं तर पप्पी आणि खटकलं तर खेटर असतं!

लव्हलेटर लव्हलेटर म्हणजे रेअर हॅबिट असतं
वरती वरती लायन आतून भेदरलेलं रॅबिट असतं
शक्य शक्य हातांमधून थथरणारा वर्ड असतं
नुकतंच पंख फुटलेलं क्युट क्युट बर्ड असतं
होपफ़ुल डोळ्यांमधलं ड्रॉप ड्रॉप वॉटर असतं !!

लव्हलेटर लव्हलेटर म्हणजे ऍग्रीमेंट असतं
५०% सर्टन आणि ५०% चं जजमेन्ट असतं
ऑपोनन्टच्या स्ट्रॅटेजीवर पुढचं सगळं डिपेन्ड असतं
सगळा असतो थेट सौदा काहीसुद्धा लेन्ड नसतं
हार्ट देऊन हार्ट घ्यायचं सरळ साध ब ं ार्टरअसतं

लव्हलेटर लव्हलेटर म्हणजे एक ड्रीम असतं
लाईफ़च्या पेस्ट्रीवरचं स्वीट स्वीट क्रीम असतं
अर्ध अ ं ध ॅ ं यावंअसंशहाळ्यामधलंवॉटरअसतं
तिसयासाठी नाहीच असं अगदी प्रायव्हेट मॅटर असतं

काळ्या मोत्यांपरी नेत्र हे ! ओठ माणकांपरी !

सुवर्ण ओतुन घडली काया ! कुंतल रेशीमसरी !

संगमर्मरी पोट नितळसे ! घट मोहाचे वक्षी !

अवघड वळणे घेवुन फिरली तारुण्याची नक्षी !!

वळणावळणावरी चोरटे नेत्र पाजळून जागे

आणि तनुवर मिरवित खजिना तुला फिरावे लागे

असे दागिन ज` ड ल`बाईमोलाचेतवदेही

जन्मभराची जोखीम झाली ! कुणा कल्पना नाही !!

------- मौनाची भाषांतरे, संदिप खरे

म्हातारपण

एकदा आले संध्याकाळी सोसाट्याचे वारे
डोक्यावरचे केस उडवून नेले सारे

येत नाही म्हणत, ऐकू कान सोडून गेले
वाक्यामधले अधले मधले शब्द सोडून गेले

चष्मा खराब, डोळे खराब काही कळत नाही
मागचे सारे दिसते स्पष्ट, पुढचे दिसत नाही

जेवण संपवून दंताजींची पंगत उठली सगळी
जून तोंडी पडली नेमकी देखणी गोरी कवळी

कंप कंपनीचा संप करतात बोटे काही
कापत रहातो पायच नुसता , अंतर कापत नाही

देहसदन सोसायटीचे हल्ली झालेत वांदे
जून झ ` ाले,बांधी आखडून वाकतात खांदे

मन म्हणते, कशाला या अर्थ असतो काही?
मान म्हणते तिन्ही त्रिकाळ नाही नाही नाही

शिवून घेतला सूट नवा , सवलती सकट
सुरकुत्यांचे क्रेप कापड , शिवणावळ फुकट

इतका सारा मेकअप , आता नाटकाला मजा
मुलगे झाले आजोबा अन मुलींच्या आज्ज्या

ओबड धोबड फणसा सारखे पिकत चालले क्षण
आवाज झालाय पावरी सारखा , शेवरी सारखे मन..

एकदा आले संध्याकाळी सोसाट्याचे वारे
डोक्यावरचे केस उडवून नेले सारे

... संदीप खरे ...

दूर नभाच्या पल्याड कोणी
दाटुन येता अवेळ पाणी
केवळ माझ्यासाठी रिमझिमते  !
केव्हा केवळ भणाणणारा
पिसाटलेला पिऊन वारा
अनवाणी पायांनी वणवणते !
कुणी माझे  , मजसाठी , माझ्याशी गुणगुणते
सा रे ग म प
प ध प ग म
म प म ग रेगरे
रे ग रे नी सा

कधी ऊन्ह लागता मध्यान्हीचे मनात मी डळमळतो
अन थकलेल्या पायांसह माझ्या सावलीत घुटमळतो
तो येतो तेव्हा मेघ जसा , अन वदतो जर दमलास असा
तर माझ्याशी येशील कसा अन केव्हा
हिरमुसल्या वाटांना मग अवचित लय मिळते

मी असाच वेडा जीव लावुनी प्रेम कराया बघतो
मी म्हणतो कोणा आपुले आणि तो माझ्यावर हसतो
मग जीवच होतो रुसलेला आर्ध्या वाटेवर फसलेला
अन डावच मोडून बसलेला त्या वेळी
त्याचेही मन तेव्हा सांजावुन थरथरते

मी रंगबीरंगी फुले कागदी पाहुन केव्हा झुरतो
तो हसतो केवळ हसता हसता मला ओढुनी म्हणतो
हे आत पसरले तुझ्या सडे पाहसी कशाला जगाकडे
त्यावाचुन केव्हा काय अडे अपुले
मग गाणे स्वत्वाचे प्राणातुन झगमगते....
सा रे ग म प
प ध प ग म
म प म ग रेगरे
रे ग रे नी सा

ही कागदाची होडी या झ-यात सोडून दिली न
ती याच अपेक्शेने
की असही होऊ शकेल
की झ-यातून नदी पर्यन्त,
नदीतून खाडीपर्यन्त
आणि खाडीतून समुद्रापर्यन्त जाऊ शकेल ही होडी !
कदाचित पूर्ण भिजणार नाही हिचा कागद
समुद्राशी पोहोचेपर्यन्त
आणि समुद्रातल्या तुफ़ान लाटानाही
लळा लावून तरन्गत राहील ही...
कडाडतील वीजा...लाटान्चे डोन्गर होतील
ख-याखु-या जहाजन्ची शिड फ़ाटून जातील
पण तरीहि या चिमुकलीच गोडुल अस्तित्व
प्रलयावर तरन्गणा-या पिम्पळपानासारख डुलत राहील!
भाबडीच आहे ही आशा
पण शेकडो वर्षाच्या वडापिम्पळाच्य
जमिनीखलि वसाहत केलेल्या मुळासरखि
सजीव आणी लासट...

होडी कगदाचीच आहे...
पण त्यावर लिहिली आहे
सारा जन्म पणाला लावून रसरसलेलीअ
एक कविता....

म्हणून तर
ही कागदाची होडी
या झ-यात सोडून दिली ना
ती...याच...तयारीने.....की....

(नेणीवेची अक्षरे)

हाताला धरून, मुसळाशेजारी बसवून,
म्हणाली कविता -
" इथे खाली मान घालून लिही !
अन जोवर फुटत नाही याला अंकुर
तोवर शपथ आहे माझी - वर बघायच नाही !!"

हा खडक काही केल्या पाझरत नाही
मी याला पहाटे गोंजारले आहे,
संध्याकाळी मावळत्या सूर्याच्या पश्चिम रंगांची भूल देऊन पाहिली आहे,
रात्री माळरानावर नाचणाऱ्या पौर्णिमेच्या चांदण्यांची शाल पांघरली आहे,
पण हा खडक काही केल्या पाझरत नाही .

उन्हाळ्यात हा तापतो,
थंडीमध्ये हा अगदी स्वभावगार,
पावसाळ्यात हा अगदीच इलाज नाही म्हणून
किंवा अगदीच वाईट दिसेल म्हणून
हिरव्या शेवाळ्याची किंचितशी शोभा वस्त्रे बाहेर बाहेर मिरवत बसतो
पण आत्ता हा खडक काही केल्या पाझरत नाही .

आता आता अजूनही मी या माळरानावर भटकायला येतो,
पण माझ्या साऱ्या गुराखी मित्रांबरोबर न रहाता
मोठ्या आशेन य` ा च्याशेजारीयेऊनबसतो
की.. हा खडक कधीतरी पाझरेल तेव्हा आपण तिथे असायला हवं.
मी माझी गाणी आवरून धरली आहेत;
मी आता पावाही वाजवत नाही;
किंवा पावलांनाही आता आतूनंच नाचावसं वाटत नाही;
या सार्यांच्यापार मला या खडकाविषयी उत्सुकता वाटू लागली आहे.
खडकाला माझ्याविषयी असे काहीच वाटत नाही
हे ज्या क्षणी लक्षात आले
तेव्हापासून मी असण्यापेक्षा खडक असणेच जास्त च ˙ ां ग लेअसेवाटूलागलेआहे

मी खडक असतो तर मलाही असं
माझ्याविषयी उत्सुकता वाटणारा,
मी आतून पाझरायला हवे असे वाटणारा
कोणी "मी" भेटेल ?
माझे प्रश्न, वर निळे आकाश, खाली हिरवे गवत,
त्या गवतावरती मी, माझ्या शेजारी हा खडक.
हा खडक काही केल्या पाझरत नाही .

हे सारे कित्येक दिवस चालू आहे.
आयुष्यभर पुरेल असे एखादे कोडे मिळणे
हेही असू शकते आयुष्याचे सार्थक.
मला माझ्या आयुष्याचे सार्थक मिळाले आहे;
मला माझ्या आयुष्याचे प्रश्न समजले आहेत.
उत्तर नसलेल्या प्रश्नावर नजर रोखून त्राटक करताना...
आता आता जाणवत नाहीसे झाले आहे -
वारा, ऊन, थंडी, पाऊस;
भुलवत नाहीसे झाले आहे -
छंद, इच्छा, अपेक्षा, ओस;
खडक झाल्यासारखे वाटत आहे.

---

संदीप खरे.

प्रेम नाही; हवी असते एक जखम फक्त
ज्याच्यायोगे गरम राहील धमन्यानमधील रक्त
ओल्या आठावनिंचे काही क्षण हवे असतात
चाकोरिला उध्वस्ताचे घन हवे असतात....

तसे काही चेहेर्यावरती अधिक उणे नसते
पण मनात दु:खी हसनार्यांचे हसन व ` `गलेदिसते
ओठात नाही हवी असते डोळ्यात एक कथा
हवी असते षडाजासारखी सलग, शांत व्यथा.........

गाणे नाही; गाण्यासाठी उर्मी हवी असते
स्वर नाही, हव्या असतात स्वरान्मधाल्या श्रुति
प्रेम नाही, हवी असते मला चवथी मिति!

प्रेम नाही दु:खासाठी तारण हवे असते
स्वत:वरच हसण्यासाठी कारण हवे असते
मनासाठी हवा असतो अस्वथाचा शाप
आत्म्यासाठी हवा असतो निखल पश्चाताप!

संदीप खरे ( नेणिवेची अक्षरे).

मी मोर्चा नेला नाही

मी मोर्चा नेला नाही, मी संपही केला नाही
मी निषेध सुद्धा साधा, कधी नोंदवलेला नाही

भवताली संगर चाले, तो विस्फ़ारुन बघताना
कुणी पोटातून चिडताना , कुणी रक्ताळून लढताना
मी दगड होउनी थिजलो, रस्त्याच्या बाजूस जेव्हा
तो मारायाला देखिल, मज कुणी उचलले नाही

नेमस्त झाड मी आहे, मूळ फ़ांद्या जिथल्या तेथे
पावसात हिरवा झालो, थंडीत झाडली पाने
पण पोटातून कुठलीही , खजिन्याची ढोली नाही
कुणी शस्त्र लपवले नाही , कधी गरूड बैसला नाही

धुतलेला सातिव सदरा, तुटलेली एकच गुंडी
टकलावर अजून रुळते, अदृश्य लांबशी शेंडी
मी पंतोजींना भ्यालो, मी देवालाही भ्यालो
मी मनात सुद्धा माझ्या, कधी दंगा केला नाही

मज जन्म फ़ळाचा मिळता, मी केळे झालो असतो
मी असतो जर का भाजी, तर भेंडी झालो असतो
मज चिरता चिरता कोणी, रडले वा हसले नाही
मी कांदा झालो नाही, आंबाही झालो नाही

मन तळ्यात मल्यात जाईच्या कल्यात
मन नाजूकशी मोती माळ तुझ्या नाजुकशा गळ्यात
उरी चाहुलिंचे मृगजल उरी चाहुलिंचे मृगजल
उरी चाहुलिंचे मृगजल
वाजे पाचोला उगी कशात
इथे वार्याला सांगतो गाणी माझे राणी
इथे वार्याला सांगतो गाणी
आणि झुलुक तुझ्या मनात
भिडू लागे रात अन्बालागी हो ........
भिडू लागे रात अम्बालागी
तुझ्या नखाची कोर नभात
माझ्या नयनी नक्षत्र तारा
माझ्या नयनी नक्षत्र तारा
माझ्या नयनी नक्षत्र तारा
आणि चाँद तुझ्या डोळ्यात
मन तळ्यात मल्यात जाईच्या कल्यात

येईन स्वप्नात मिटल्या डोळ्यात घेशील का मला??
तुझ्या मनाच गुलाबी फुल देशिल का मला ??
सांग तुझ्या मनाच गुलाबी फुल देशिल का मला ??

वेड हसण्याची वेड दिसण्याची वेड रुसण्याची ग
वेड्या चंद्राची वेड्या ता-यांची रात्र वेडाची ग
वेड्या प्रश्नाच वेड उत्तर देशील का मला??
तुझ्या मनाच गुलाबी फुल देशिल का मला ??

माझ्या नेत्रात माझ्या गात्रात मनात माझिया
तुझ्या गंधाचा तुझ्या छंदाचा उधाणे पुरिया
तुझ्या भरतिचा चंद्र नवतिचा करशिल का मला??
सांग तुझ्या मनाच गुलाबी फुल देशिल का मला ??

बघ जरा एकदा , ऐक माझ्या फुला
मौन माझे आता सांग बघते तुला
तुच स्वप्नातली चंद्रिका साजिरी
तुच सत्यातली मोहिनी लाजरी
अभ्र विरताना रात्र ढळताना येशिल का जरा??
कोणी नसताना काही कळताना येशिल का जरा??
तुझ्या नावात माझ्या नावाला घेशिल का जरा??
सांग तुझ्या मनाच गुलाबी फुल देशिल का मला ??

येईन स्वप्नात मिटल्या डोळ्यात घेशील का मला??
तुझ्या मनाच गुलाबी फुल देशिल का मला ??
सांग तुझ्या मनाच गुलाबी फुल देशिल का मला ??

क्षणात लपून जाशी क्षणात दिसून
जसे काही श्रावणाचे सोनसळी उन्ह

किती आलो दूर दूर तरिही अजून
वा-यावर वाहताहे तुझी तुझी धुन
पळतात ढग तुझा सांगावा घेऊन

शोधाया निघालो राणी असे एक गाव
पात्यापात्यावर जिथे दिसे तुझे नाव
जिथे तुझा गंध करी फुलांना तरुण
क्षणात लपून जाशी क्षणात दिसून

जाणवती आसपास कसे तुझे भास
वाटे आता थांबणार अवघा प्रवास
मनातली स्वप्ने सारी येतिल रुजून
क्षणात लपून जाशी क्षणात दिसून

## .. ?

रात्री बायको बरोबर गाडी वरुन घरी जाताना
ती खोडकर आवाजात सांगू लागते
आमच्याच घरच्या खाणाखूणा...
' हां.. आता इथून डावीकडे... आता सरळ..
त्या मारुती पासून उजवीकडे वळा..
थोडी पुढे घ्या अजुन... पांढऱ्या गेटपाशी थांबवा...
हां... बास बास... इथेच... '
आणि मग उतरत, पर्स काढत
विचारते हसत हसत - ' हां... किती झाले ? '

८४ लक्ष तर झालेच की प्रीये !
हा तरी शेवटचा की नव्या जन्मवर्तुळाचा हा प्रारंभ ... ठाउक नाही !
गतजन्माचे आठवत नसेलही काही आपल्याला,
पण तेंव्हाही असतील असेच तुझे जन्मप्रामाणिक हसरे क्षण
आणि माझे अंतःस्थ उदासीन प्रश्न काही !!

आता पर्स काढलीच आहेस तर ठेव हातावर
एखादी साखरहळवी टॉफी...
गोड चविन स ` रु द `अजुनएकरात्र
अंधारातच चढायचा आहे एक एक जिना...
हातात हात तेवढा राहू दे फक्त....

..........

तो प्रवास कसला होता, मी स्वत:स पुसुनी थकलो
तू प्रारंभच ना केला ; अन मी अर्ध्यातुन वळलो !

तुजवरी लावला जिव... हे मुळात चुकले माझे
मी पाउस हुडकायाला ग्रिष्माच्या गावा शिरलो !

कधी जनातुनी... कधी विजनी.. कधी नयनी.. मनात अंति !
कधी तुला शोधण्यासाठी बघ कुठवर वनवन फिरलो ...

दिनरात धाडली तुजला मी निमंत्रणे कवितांची
पण खरेच आलीस तेव्हा शब्दांच्या मागे दडलो

मेंदिभरल्या हातान स` नईचेवेचीतसुर
तू सुखात रडलीस तेव्हा मी उदास होउन हसलो...

क्षितिजाच्या पार वेड्या संध्येचे घरटे
वेड्या संध्येच्या अंगणी रात थरथरते
कुणी जा दूर तशी मनी हूरहूर
रात ओलावत सूर वात मालवते...

आता बोलायाला कोण संगे चालायाला कोण
कोण टाकेल जीवाचे ओवाळून लिंबलोण
पायरीला ठसे दार खुले छत पिसे
कुण्या उडल्या राव्याचे गीत घर भरते ...

आता विझवेल दिवा सांज कापऱ्या हातांनी
आणि आभाळाचे गूज चंद्र सांगेल खुणांनी
पडतील कुणी पुन्हा भरतील डोळे
पुन्हा पुसतील पाणी हात थरथरते...

मनी जागा एक जोगी त्याचे आभाळ फाटके
त्याचा दिशांचा पिंजरा त्याच्या झोळीत चटके
भिजलेली माती त्याचे हललेले मूळ
त्याचे क्षितिजाचे कूळ त्या चालवते...

सांज अबोला अबोला सांज कल्लोळ कल्लोळ
सांज जोगीण विरागी सांज साजीरी वेल्हाळ
सांजेवर फूल गंध मौनाचा हवेत
दूर लागले गावात दीप फरफरतेक्षितिजाच्या पार वेड्या संध्येचे घरटे
वेड्या संध्येच्या अंगणी रात थरथरते
कुणी जा दूर तशी मनी हूरहूर
रात ओलावत सूर वात मालवते...

आता बोलायाला कोण संगे चालायाला कोण
कोण टाकेल जीवाचे ओवाळून लिंबलोण
पायरीला ठसे दार खुले छत पिसे
कुण्या उडल्या राव्याचे गीत घर भरते ...

आता विझवेल दिवा सांज कापऱ्या हातांनी
आणि आभाळाचे गूज चंद्र सांगेल खुणांनी
पडतील कुणी पुन्हा भरतील डोळे
पुन्हा पुसतील पाणी हात थरथरते...

मनी जागा एक जोगी त्याचे आभाळ फाटके
त्याचा दिशांचा पिंजरा त्याच्या झोळीत चटके
भिजलेली माती त्याचे हललेले मूळ
त्याचे क्षितिजाचे कूळ त्या चालवते...

सांज अबोला अबोला सांज कल्लोळ कल्लोळ
सांज जोगीण विरागी सांज साजीरी वेल्हाळ

सांजेवर फूल गंध मौनाचा हवेत
दूर लागले गावात दीप फरफरते

या जमिनीत

एकदा स्वतःला गाडून घेईन म्हणतो । । .

चारदोन पावसाळे बरसून गेले

की रानातलं झाड बनून

परत एकदा बाहेर येईन . . .

म्हणजे मग माझ्या झाडावरच्या

पानापानांतून, देठादेठावर,

फांदीफांदीलाच मीच असेन . . .

येणारे जाणारे क्षण्भर थबकून,

सुस्कारत म्हणतील -

" बर झ ं ा लंहेझाडआलं

अगदीच काही नसण्यापेक्षा . . . !"

आणि पानापानांतून माझे चेहरे

त्यांना नकळत न्याहाळत खुदकन् हसतील . . .

माझ्या पानांतून वाट काढणाऱ्या सूर्यकिरणांबरोबर

माझ ह ं सूआणिझुळूकश्वास

माझ्या सावलीतल्या लोकांवर पसरून देईन . . .

त्यांच्या घामाचे ओघळ

माझ्या सावलीत सुकताना हळूच म्हणेन -

" बर झ ं ा लंहेझाडआलं

अगदीच काही नसण्यापेक्षा . . . !"

माझ्या अंगाखांद्यांवर

आत्तापर्यंत हूल देणारी ती स्वप्निल पाखरं

आता त्यांच्याही नकळत माझ्या अंगाखांद्यांवर झोके घेतील . . .

त्यांची वसंतांची गाणी

उडत माझ्या कानी येतील . . .

ती म्हणतील -

" बर झ ं ा लंहेझाडआलं

नाहीतर सगळा रखरखाटच होता !

याच जागी आपल्या मागे लागलेला

तो वेडा कवी कुठे गेला ?"

मी पान स ं व्सव्वतकुजबुजीन

" बर झ ं ा लंमीझाडझालो

वेडा कवी होण्यापेक्षा

आणखी काही वर्षांनी

मी सापडतच नसल्याचा शोध

कदाचित, कुणाला तरी लगेलही . . .

एखाद्या बेवारस, कुठल्याही

पण आनंदी चेहऱ्याच्या शवापुढे

ते माझ्या नावान अ ` श्रुढळतील.

माझी वेडी गाणी आठवत

कोणी दोन थेंब अधिक टाकेल . . .

आणी . . .

माझ्या चितेच्या लाकडांसाठी

माझ्याचभोवती गोळा होत

घाव टाकता टाकता ते म्हणतील -

" बर झ ं ा ल ं हेझाडइथेआलं

अगदीच लांब जाण्यापेक्षा . . ."

देते कोण-चिमुकल्या चोचीमध्ये आभाळांचे गाणे...
मातीतल्या कणसाला मोतियांचे दाणे...
उगवत्या उन्हाला ह्या सोनसळी अंग...
पश्चिमेच्या कागदाला केशरिया रंग ...
देते कोण..देते कोण.. देते कोण देते ??

रुम... रुम ता रा रा... रुम
रुम...ता रा रा.... रुम
रुम ता रा रा... रुम तारा...

सुर्यासाठी उषा आणि चंद्रासाठी निशा...
घरी परतण्यासाठी पाखरांना दिशा.... (देते कोण... देते कोण....)
मध खाते माशी तरी सोंडेमध्ये डंख...
चिकटला कोळी त्याच्या पायाखाली डिंक...
देते कोण.. देते कोण.. देते कोण देते?? ॥

रुम... रुम ता रा रा... रुम
रुम...ता रा रा.... रुम
रुम ता रा रा... रुम तारा...

नागोबाच्या फण्यावर दहाचा आकडा...
खेकड्याच्या प्रवासाचा नकाशा वाकडा...(देते कोण... देते कोण.... )
कोळंब्याला चीक आणि अळूला ह्या खाज...
कोणी नाही बघे तरी लाजाळुला लाज...
देते कोण.. देते कोण.. देते कोण देते?? ॥

रुम... रुम ता रा रा... रुम
रुम...ता रा रा.... रुम
रुम ता रा रा... रुम तारा...

मुठभर जीव..आणि हातभर तान...
कोकिळेला गुरू नाही तरी गाई गान... (देते कोण... देते कोण.... )
काजव्याच्या पोटातून जळे गार दिवा...
पावसाच्या अगोदर ओली होते हवा...
देते कोण.. देते कोण.. देते कोण देते?? ॥

रुम... रुम ता रा रा... रुम
रुम...ता रा रा.... रुम
रुम ता रा रा... रुम तारा...

भिजे माती आणि उरे अत्तर हवेत...
छोट्या छोट्या बियांतून लपे सारी शेतं...
नाजुकश्या गुलाबाच्या भोवतीन`काटे...

सरळश्या खोडावर फुटे दहा फाटे ..
देते कोण.. देते कोण.. देते कोण देते?? ॥

रुम... रुम ता रा रा... रुम
रुम...ता रा रा.... रुम
रुम ता रा रा... रुम तारा...

आभाळीच्या चंद्रामुळे लाट होते खुळी...
पाण्या नाही रंग तरी नदी होते निळी...
भुईतून येतो तरी नितळ हा झरा...
चिखलात उगवतो तांदुळ पांढरा...
देते कोण.. देते कोण.. देते कोण देते?? ॥

रुम... रुम ता रा रा... रुम
रुम...ता रा रा.... रुम
रुम ता रा रा... रुम तारा...

.....Sandip Khare

व्यर्थ हे सारेच टाहो, एक हे ध्यानात राहो,
मूठ पोलादी जयांची, ही धरा दासी तयांची||

पैज जे घेती नभाशी, आणि धडका डोंगराशी
रक्त ज्यांचे तप्त आहे फक्त त्यांना हक्क आहे,
श्वास येथे घ्यावयाचा, आग पाण्या लावण्याचा,
ऊरफाड्या छंद आहे, मृत्यु ज्यांना वंद्य आहे,
साजिर्‍या जखमा भुजांशी, आणि आकांक्षा ऊराशी,
घाव ज्यांचा भाव आहे, लोह ज्यांचा देव आहे,
माती हो विभुती जयांची, ही धरा दासी तयांची,
मूठ पोलादी जयांची, ही धरा दासी तयांची||

शब्द लोळाचे तयांचे, नृत्य केवळ तांडवाचे ,
सूरनिद्रा भंगण्याला छिन्नी-भाकीत कोरण्याला,
जे न केवळ बरळती गोड गाणी कोरडी ,
जे न केवळ खरडती चंद्र -तार्‍यांची स्तुती,
झेप ज्यांनी घालुनी, अंबरांना सोलुनी,
तारका चुरगाळल्या, मनगटाला बांधल्या,
ग्रह जयांची तोरणे, सूर्य ज्यांचे खेळणे,
अंतराळे माळती , सागरे धुंडाळती ,
वन्हीला जे पोळती, रोज लंका जाळती,
ही अशी शेपूट जयांची, ही धरा दासी तयांची
मूठ पोलादी जयांची, ही धरा दासी तयांची||

हस्तकी घेऊन काठी, रेशमी घालून छाटी,
राम ओल्या तप्त ओठी, राख रिपूची अन ललाटी,
दास ऐसा मज दिसू दे, रोमरोमांतून वसू दे,
सौख्य निब्बरशा त्वचेशी वेदना ही ठस ठसू दे,
थेंब त्या तेजामृताचा मज अशक्ताला मिळू दे,
कांचनातून बद्ध जिण्या परीस पोलादी मिळू दे,
जे स्वतःसाठीच वाहे रक्त ते सारे गळू दे,
रक्त सारे लाल अंती, पेशीपेशींना कळू दे,
अश्रु आणि घाम ज्यांनी मिसळोनी रक्तामधोनि,
लाख पेले फस्त केले आणि स्वतःला मस्त केले ,
त्या बहकल्या माणसांची, त्या कलंदर भंगणांची,
ही नशा आकाश होते, सर्जराचा कोष होते,
ही अशी व्यसन`जयांची, ही धरा दासी तयांची,
मूठ पोलादी जयांची, ही धरा दासी तयांची||

व्यर्थ हे सारेच टाहो, एक हे ध्यानात राहो,
मूठ पोलादी जयांची, ही धरा दासी तयांची||
--- संदीप खरे

दिवस असे की कोणी माजा नाही अन मी कोणाचा नाही
दिवस असे की कोणी माजा नाही अन मी कोणाचा नाही

आकाश्याच्या छत्रीखाली भिजतो, आयुष्यावर हसन थ ` ुन्कुनदेतो
आकाश्याच्या छत्रीखाली भिजतो, आयुष्यावर हसन थ ` ुन्कुनदेतो
या हस्नयाचे कारन उमगत नाही, या हसन म ` हणवतनाही
दिवस असे की कोणी माजा नाही अन मी कोणाचा नाही

प्रश्नांचे हे एकसंधसे तुकडे, त्यावर नाचे मनीचे अबलक घोडे
प्रश्नांचे हे एकसंधसे तुकडे, त्यावर नाचे मनीचे अबलक घोडे
या घोड्याला लगाम शोधत आहे, परी मजला गवसत नाही
दिवस असे की कोणी माजा नाही अन मी कोणाचा नाही

मी तुसडा की मी भगवा बैरागी, मद्यपि वा मी गांजेवाला जोगी
मी तुसडा की मी भगवा बैरागी, मद्यपि वा मी गांजेवाला जोगी
अस्तित्वाला हजार नावे देतो, परी नाव ठेववत नाही
दिवस असे की कोणी माजा नाही अन मी कोणाचा नाही

मम म्हणताना आता हसतो थोड़े, मिठुन घेतो वस्तुस्थितीचे डोळे
मम म्हणताना आता हसतो थोड़े, मिठुन घेतो वस्तुस्थितीचे डोळे
या जगण्याला स्वप्नान्चाही आता, मेघ पालवत नाही
दिवस असे की कोणी माजा नाही अन मी कोणाचा नाही

अफाट होती तुझी स्मरणशक्ती
अफाट होती तुझी स्मरणशक्ती
तुला नेमकेठाऊक होते , एकमेकाना पहिल्यान्दा पाहीले
तेव्हा सुर्याचा पृथ्वीशी असलेला नेमका कोन
एकमेकान्च्या नजरेत हारवताना
आपन नक्की किती होतो एक का दोन?

तुला ठाऊक होते माझ्या कुठल्या शर्टला होती किती बटने ?
कुठल्याचा उसवला होटा खिसा ?
रात्रभर गाणी म्हणून दाखवताना
नेमका कितव्या गाण्याला बसला होता घसा

तुझ्याशी बोलताना चुकून जाम्भई निसटली
त्या दिवसाची तारीख, महिना, वर्ष, वेळ
आणी एकून किती मायक्रो सेकन्द टिकू शकला होता
मुश्किलीन ए` क मेकान्शीअबोलाधरण्याचाखेळ

आठवतेका तुला रातरानी शेजारी बसून
कविता म्हणून दाखवताना
फुललेल्या एकूण कळ्यान्ची सन्ख्या
माझ्या अक्षराची पुस्तकात लिहीलेली मानसशास्त्रीय व्याख्या

नेमके आठवत होते तुला
कवितानी बोट टिकवले होते ते नेमके कुठल्या क्षणान्वर
आणी मनावरील पानावर कोरल्या गेल्यावरही
कुठली कविता कुठल्या पानावर

अफाट होती तुझी स्मरनशक्ती
मलाच कसेकाय विसरलीस कुणास ठाऊक ?

संदीप खरे.......

राधे रंग तुझा गोरा,

राधे, रंग तुझा गोरा सांग कशान` रापला?
सावळ्याच्या मिठीमध्ये रंग सावळा लागला ?

राधे, कुंतल रेशमी..सैरभैर गं कशाने?
उधळले माधवानेकिंवा नुसत्या वारयाने?

राधे, नुरले कशान त ` ुजवस्त्रांचेहीभान?
निळा प्रणय अथवा एका बेभानाचे ध्यान?

राधे, कासाविशी अशी.. तरी 'वेडी' कशी म्हणू ?
तुझ्या रुपान प ` ा हिलीएकवेडीपिशीवेणू

राधे, दृष्टीतून का ग घन सावळा थिजला?
इथे तुझ्या डोळा पाणी...तिथे मुरारी भिजला !!

डोळा पाणी.. जिणे उन्ह..इंद्रधनुचा सोहळा
पुसटले साती रंग...एक " श्रीरंग " उरला !!